दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८७ | बुधवार दि.१७ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## संपादकीय

### ऑपरेशन टायगर की संघटनात्मक आव्हान?

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कथितरित्या 'ऑपरेशन टायगर' राबवून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील काही खासदारांना आपल्या गटात आणण्याचा प्रयत्न सुरू केल्याच्या चर्चांनी महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडवून दिली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर आपल्या खासदारांची तातडीची बैठक बोलावली. या बैठकीला सर्व खासदार प्रत्यक्ष उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्क–वितर्कांना उधाण आले.

# शेतकऱ्यांचा विरोध डावलून भूसंपादन

## शक्तिपीठ महामार्गासाठी अधिसूचना जारी, १३ जिल्ह्यांतील गावांची यादी जाहीर

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असलेल्या पवनार ते पत्रादेवी (नागपूर–गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ द्रुतगती महामार्गाच्या भूसंपादनाची अधिसूचना सरकारकडून जारी करण्यात आली आहे. यामुळे आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून राज्यातील १३ जिल्ह्यांतील गावांमधील जमिनीचे संपादन केले जाणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ८,७०९.८९८७ हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे.**



या महामार्गात १३ जिल्ह्यांतील ४०९ गावांचा समावेश आहे. या महामार्गाला राज्यभरातून शेतकऱ्यांचा जोरदार विरोध होत असतानादेखील यातील काही गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण करण्यात आले. आता उर्वरित गावांमध्ये भूसंपादन होणार आहे. याबाबतची अधिसूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केली आहे. प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग एकूण १३ जिल्ह्यांमधून जात आहे. या महामार्गाची एकूण लांबी ८५६ किलोमीटर आहे. महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५५) याच्या कलम (२) व (३) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी शासनाकडून जमीन अधिग्रहित ▶▶ पान २ वर

### मराठवाड्यातील या गावांचा समावेश

नांदेड जिल्हा – पेवा, करोडी, येळंब, धानोरा, निवघा, महाताळा, वरुला, बोरगाव, कोळी, नेवरी, नेवरवाडी. हिंगोली जिल्हा – शेवाळा, पिंपरी खुर्द (अ), आढा (अ), आखाडा बाळापूर, देवजना, कांडली, काळ्याची वाडी, भुरक्याचीवाडी, पावनमारी, बउर, पेठवडगाव, टोव्हा, निमटोक, जांब ता. सिंदगी, पोत्रा, सिंदगी, वापटी, कुपटी, खापरखेडा, सिरली, खांबाळा, चौंडी त. सेंदूरसेना, मरसूल त. सेंदूरसेना, पिंपरी, वाई त. धामनगाव, सिंगी, गुंडा, करंजाळा, बोरी सावंत, आडगाव (रं.), हट्टा, पिंपळगाव कुटे, संगमेश्वर, सेंदूरसेना, मार्डी, शिरड शहापूर, उमरा, सिरला तांडा, वडद, रांजाळा. परभणी जिल्हा – नांदगाव खुर्द, नांदगाव बुद्रुक, असोला, पिंगळी, पोखर्णी (नृ.), दैठणा, शिर्शी बु, कान्हेगांव. बीड जिल्हा – कौठळी तांडा, तळेगाव (परळी), भारज, सायगाव. लातूर जिल्हा – काटगांव, मुरूड अकोला. धाराशिव जिल्हा – धाराशिव, देवळाली, शेकापूर, वडगांव (सि), गांवसूद, वरवंटी.

## थोडक्यात...

### डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय कफ सिरप मिळणार नाही

दिल्लीः केंद्र सरकारने खोकल्याच्या सिरपसह सर्व प्रकारच्या औषधी सिरपच्या विक्रीसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने औषध नियम, १९४५ मध्ये बदल करत आता कोणतेही सिरप खरेदी करण्यासाठी डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन (चिठ्ठी) अनिवार्य असणार आहे. केंद्र सरकारने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. या निर्णयानुसार आता खोकला, सर्दी, ताप किंवा इतर कोणत्याही आजारासाठी वापरल्या जाणाऱ्या सिरपची विक्री डॉक्टरांच्या लिखित सल्ल्याशिवाय करता येणार नाही. सरकारच्या मते, काही औषधी सिरपचा गैरवापर होत असल्याच्या तक्रारी वाढत होत्या. तसेच वैद्यकीय सल्ल्याशिवाय औषधे घेण्याचे प्रमाण वाढल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होत होती. त्यामुळे औषधांचा सुरक्षित आणि नियंत्रित वापर करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### विहिर अपघात : रस्ते कंत्राटदारावर गुन्हा दाखल

सोलापूरः सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी गावाजवळ रविवारी दुपारी एका पिक–अप वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतातील विहिरीत पडून अपघात झाला होता. याप्रकरणी पोलिसांनी एका रस्ते कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेत चार महिला आणि चार मुलांसह एकूण आठ जण ठार झाले, तर सात जण जखमी झाले होते. या भागात रस्ते विकासाचे काम करणाऱ्या नवजोत गढोक यांच्या कंपनीचे नावही एफआयआरमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. पोलिसांनी सांगितले की, रस्त्याच्या कडेला शेतातील विहीर असल्याची माहिती असूनही कंत्राटदाराने अपघातस्थळी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात कसूर केली. कंत्राटदाराने त्या ठिकाणी संरक्षक कठडे, धोक्याच्या सूचना देणारे फलक, गतिरोधक आणि रिफ्लेक्टर्स बसवणे आवश्यक होते.

### शिक्षक भरतीला ३० जूनपर्यंत पुन्हा मुदतवाढ

पुणेः राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेअंतर्गत पवित्र संकेतस्थळावर रिक्त पदांच्या जाहिराती नोंदविण्या साठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता शाळा व्यवस्थापनांना ३० जूनपर्यंत जाहिराती नोंदवता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया शिक्षण विभागाच्या पवित्र संकेतस्थळामार्फत राबविण्यात येते. त्यानुसार २०२५ ची पदभरती प्रक्रिया सुरू केली आहे. याअंतर्गत शिक्षक पदभरतीच्या जाहिराती संकेतस्थळावर नोंदविण्यासाठी ३१ मेपर्यंतची मुदत दिली होती. त्यानंतर १५ जूनपर्यंत मुदतवाढ दिली होती. त्यानुसार ही मुदत संपुष्टात आली. परंतु, अद्यापही काही व्यवस्थापनांना जाहिरात देण्यास काही कालावधीची आवश्यकता असल्याने पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जून २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०९.०० क्विंटल | २,०८२ | ३,२०० | २,३१९ |
| ज्वारी/हायब्रिड: १८४.०० क्विंटल | २,००० | ४,२०० | २,७२८ |
| मका/लोकल: २.५० क्विंटल | २,०३० | २,०३० | २,०३० |
| तूर : १.०० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,२९६ | २,४६५ | २,३८१ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,२११ | ५,२११ | ५,२११ |

# शेतकऱ्यांनो पेरणीची घाई करू नका, सरकारचे आवाहन

## जूनमध्ये केवळ २६ टक्के पर्जन्यमान



मुंबई । प्रतिनिधी

मंगळवारी राज्य मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आलेल्या पीक परिस्थितीच्या आढाव्यानुसार, जूनच्या पहिल्या पंधरवड्यात महाराष्ट्रात सामान्य पावसाच्या केवळ २६ टक्के पाऊस झाला, त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना पिकांची पेरणीसाठी ''घाई करू नका'' असा सल्ला दिला आहे.राज्यात ▶▶ पान २ वर

# तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली?

## मुख्यमंत्र्यांना थेट इशारा

मुंबई । प्रतिनिधी

**अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्तपदी नियुक्ती झाल्यापासून तुकाराम मुंढे यांनी राज्यभर भेसळखोर आणि नियमभंग करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू केली आहे. अवघ्या काही दिवसांत कोट्यवधी रुपयांचा भेसळयुक्त माल जप्त करण्यात आल्याने अनेक व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. अशातच त्यांच्या संभाव्य बदलीच्या चर्चांना वेग आला असून, याबाबत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने सरकारला थेट इशारा दिला आहे.**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विजय सागर यांनी सांगितले की, तुकाराम मुंढे यांची कारवाई ग्राहकांच्या हिताची असून त्यांना पूर्ण पाठिंबा आहे. व्यापारी वर्गाकडून त्यांच्या बदलीसाठी सरकारवर दबाव आणला जात असल्याची चर्चा आहे. मात्र सरकारने अशा कोणत्याही दबावाला बळी पडू नये, अशी मागणी त्यांनी केली. यासाठी राज्यभर जनजागृती मोहीम, स्वाक्षरी अभियान राबविण्यात येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात पत्रही देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या विषयावर चर्चा करण्यासाठी मुंढे यांची मंत्रालयात भेट घेणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.



तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर एफडीएने राज्यभर मोठ्या प्रमाणावर कारवाया सुरू केल्या आहेत. यापूर्वी मनुष्यबळाच्या कमतरतेचे कारण देत मर्यादित कारवाया करणारा विभाग आता रोज छापे टाकत असल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर ▶▶ पान २ वर



# पीएम नरेंद्र मोदी–डोनाल्ड ट्रम्प यांची आमनेसामने भेट

पॅरीस । वृत्तसंस्था

फान्स मधील एवीएन येथील जी–७ शिखर परिषदेदरम्यान तब्बल १६ महिन्यांनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची पहिली सार्वजनिक भेट झाली. यावेळी दोन्ही नेत्यांनी हस्तांदोलन केले.

परिषदेच्या प्रारंभी यजमान फ्रान्स देशाचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पंतप्रधान मोदी यांचे विशेष स्वागत केले. त्यांनी मोदी यांना पुष्पगुच्छ दिला आणि दोन्ही नेत्यांमध्ये काही काळ अनौपचारिक संवादही झाला. त्यानंतर मोदी आणि ट्रम्प समोरासमोर आले आणि हस्तांदोलन करत एकमेकांची विचारपूस केली. गेल्या १६ महिन्यांत दोन्ही नेत्यांची कोणतीही सार्वजनिक प्रत्यक्ष ▶▶ पान २ वर

# वाळू घोटाळा प्रकरणी १९ जणांवर गुन्हे, महसूल विभागात खळबळ

● मुख्य सुत्रधार वगळला

गेवराई । प्रतिनिधी

**तालुक्यातील राक्षसभुवन परिसरात घरकुल लाभार्थ्यांच्या नावावर मोठ्या प्रमाणात झालेल्या कथित अवैध वाळू उपसा प्रकरणात प्रशासनाने कारवाईची प्रक्रिया सुरू केली असून, या प्रकरणात महसूल विभागातील काही कर्मचारी आणि खासगी व्यक्तींसह एकूण १९ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे अवैध वाळू माफिया तसेच महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.**

प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, राक्षसभुवन येथील गोदापात्रातून सुमारे १९ हजार ब्रास अतिरिक्त वाळू उपसा झाल्याचे चौकशीत समोर आले आहे. या प्रकरणाची ▶▶ पान २ वर



# आता कौटुंबिक वाटणीची मोजणी फक्त २०० रुपयांत


मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील सर्वसामान्य शेतकरी आणि जमीनधारकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक आणि मोठा निर्णय घेतला आहे. जमीन मोजणीच्या प्रक्रियेत होणारा उशीर आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी शासनाने मोजणीचे नवे दर आणि कडक नियम जारी केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता कुटुंबात झालेल्या जमिनीच्या ▶▶ पान २ वर

# शिवसेना ठाकरे गटाचे नेते दिल्लीत

## 'ऑपरेशन टायगर' थांबवण्यासाठी प्रयत्न, सर्व खासदारांशी संपर्क वाढविला



मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत, अनिल देसाई दिल्लीत आहेत. सोबतच अरविंद सावंत, राजाभाऊ वाझे हे देखील मंगळवारी दिल्लीत पोहचले आहेत. या सर्व नेत्यांना निमित्त संसदेच्या विविध समित्यांच्या बैठकीचे आहे. मात्र ज्या राजकीय पार्श्वभूमीवर हे नेते दिल्लीत आहेत त्याची चर्चा देखील राजकीय वर्तुळात होत असून, 'ऑपरेशन टायगर' ▶▶ पान २ वर

# रोहित दादा शेतकऱ्यांना चंदन की पंढरपूरचा बुक्का




सुभाष चौरे। मुंबई–बीड

राजकारणामध्ये प्रत्येक नेता शेतकऱ्याचा तारणहार असतो, मात्र शेतकऱ्यांना न्याय कधी मिळेल ही अपेक्षा वर्षानुवर्ष शेतकरी बाळगत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात तीर्थक्षेत्र पंढरपूर मध्ये अन्नत्याग आंदोलन सुरू केले आणि ते रात्रीचे सुटले देखील. मात्र निर्णय काय झाला ? हे आणखीही समजले नाही. त्यामुळे आता शेतकरीच म्हणत आहेत, दादा उपोषण सुटले पदरात काय पडले, चंदन की पंढरपूरचा बुक्का.

शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत आहेत. या काबाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. राज्य शासनाने कर्जमाफीची केलेली घोषणा फसवी असल्याचा आरोप विरोधी पक्षाकडून केला जात आहे. सत्ताधारी आपण कर्जमाफी केल्याचे ठासून सांगत आहेत तर दुसरीकडे त्यातील जाचक अटी मात्र शासन सांगत नाही. याच शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी व्हावी यासाठी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार रोहित पवार यांनी पंढरपूरमध्ये अन्नत्याग आंदोलन केले. या आंदोलनाला राज्यभरातून मोठा पाठिंबा मिळत होता. हे आंदोलन व्यापक होणार अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. प्रामुख्याने



विधानसभेचे पावसाळी अधिवेशन तोंडावर आलेले असताना, सरकारला कोंडीत पकडण्यासाठी ही मोठी संधी होती, मात्र ही संधी रोहित पवार यांनी सोडली असेच म्हणावे लागेल. असो, त्यांनी शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलन केले. मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीमध्ये आंदोलन मागे घेतले मात्र या आंदोलनाचे ▶▶ पान २ वर

### रोहित पवारांनी संधी दवडली

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर पंढरपूरमध्ये सुरू केलेल्या आंदोलनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत होता आणि या प्रतिसादामुळे सरकारी यंत्रणा देखील चांगलीच हलवली होती. परंतु हे आंदोलन मागे घेण्यात आल्याने पाठिंबा देण्यासाठी निघालेल्या विविध संघटनांना अर्ध्या मार्गातून परत यावे लागले. या आंदोलनामधून रोहित पवार यांचे नेतृत्व पुन्हा पुढे आले असते. आंदोलन मागे घेऊन त्यांनी ही संधी दवडली असे बोलले जात आहे.




# लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात

पुणे । प्रतिनिधी

**'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांसाठी आनंदाची बातमी असून, मे महिन्याचा सन्मान निधी १५ जूनच्या सायंकाळपासून टप्प्याटप्प्याने त्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा होण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून हप्त्याच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो महिलांना त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.**

यापूर्वी शासनाने मार्च आणि एप्रिल महिन्यांचा निधी एकत्रितपणे वितरित केला होता. त्यानंतर आता थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# ऑपरेशन टायगर की संघटनात्मक आव्हान ?

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कथितरित्या 'ऑपरेशन टायगर' राबवून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील काही खासदारांना आपल्या गटात आणण्याचा प्रयत्न सुरू केल्याच्या चर्चांनी महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडवून दिली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर आपल्या खासदारांची तातडीची बैठक बोलावली. या बैठकीला सर्व खासदार प्रत्यक्ष उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले. काही खासदारांनी अनुपस्थितीची कारणे दिली, तर काहींच्या संपर्काबाबत प्रश्न उपस्थित झाले. त्यानंतर शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी पाच खासदार प्रत्यक्ष उपस्थित तर चार खासदार ऑनलाइन सहभागी झाल्याचे स्पष्टीकरण दिले असले, तरी या बैठकीने निर्माण झालेली राजकीय उत्सुकता कमी झालेली नाही.

खरे तर महाराष्ट्रातील राजकारणात 'ऑपरेशन' हा शब्द नवीन राहिलेला नाही. गेल्या काही वर्षांत पक्षफोड, गटबाजी, राजकीय स्थलांतर आणि सत्ता समीकरणांतील बदल यामुळे अशा चर्चांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे 'ऑपरेशन टायगर' हा केवळ राजकीय अफवांचा विषय नसून, तो उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वासमोरील संघटनात्मक आव्हानांचीही आठवण करून देतो. बैठकीदरम्यान उद्धव ठाकरे यांनी ''ज्यांना जायचे आहे त्यांनी जावे'' अशी भूमिका मांडल्याचे वृत्त समोर आले. ''उडाले ते कावळे, बाकीचे मावळे'' हा त्यांचा अनेकदा उच्चारलेला राजकीय संदेश आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत शिवसेनेतून झालेल्या मोठ्या प्रमाणातील गळतीच्या पार्श्वभूमीवर या विधानाचा अर्थ अधिक गंभीर बनतो. कारण प्रत्येक राजकीय पक्षासाठी केवळ निष्ठावान कार्यकर्ते पुरेसे नसतात; पक्षाची विस्तारक्षमता, नवीन नेतृत्वाची निर्मिती आणि संघटनात्मक वाढही तेवढीच महत्त्वाची असते.विशेष म्हणजे, एकीकडे संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी देशाच्या राजकारणात नेतृत्व करावे अशी अपेक्षा व्यक्त केली, तर दुसरीकडे या दोन्ही पक्षांचे राज्यातील संघटनात्मक अस्तित्व मर्यादित होत असल्याचे चित्रही दिसून येते. मोठ्या राष्ट्रीय आकांक्षा बाळगणाऱ्या कोणत्याही पक्षासाठी प्रथम स्वतःचा राज्यातील पाया मजबूत असणे आवश्यक असते. त्या दृष्टीने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) समोर अनेक प्रश्न उभे आहेत.एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर राज्यात उद्धव ठाकरे यांच्याबाबत मोठ्या प्रमाणात सहानुभूतीची लाट निर्माण झाली होती. लोकसभा निवडणुकीत त्याचा काही प्रमाणात लाभही पक्षाला झाला. मात्र, सहानुभूती हा कायमस्वरूपी राजकीय भांडवलाचा स्रोत नसतो. कालांतराने जनतेला आणि कार्यकर्त्यांना नेतृत्वाची सक्रियता, संघटनात्मक विस्तार आणि संघर्षाची दिशा दिसणे आवश्यक असते. याच ठिकाणी ठाकरे गटाची कमतरता प्रकर्षाने जाणवते.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची कार्यपद्धती पाहिली तर ते सतत राज्यभर दौरे करताना दिसतात. सरकारी कार्यक्रमांबरोबरच पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी ते सातत्याने कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहतात. स्थानिक पातळीवरील नेतृत्वाशी संवाद साधणे, नवीन कार्यकर्त्यांना संधी देणे आणि पक्षाचा विस्तार करणे यावर त्यांचा भर असतो. त्यामुळे त्यांचा पक्ष तुलनेने नवखा असूनही अनेक भागांत प्रभाव निर्माण करण्यात यशस्वी ठरला आहे.याउलट उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून अशा प्रकारची संघटनात्मक चळवळ दिसून येत नाही. आरोग्याच्या कारणांमुळे उद्धव ठाकरे यांना राज्यभर दौरे करणे मर्यादित प्रमाणात शक्य होत असेल, तर पक्षाचे युवा नेतृत्व म्हणून आदित्य ठाकरे, तसेच इतर वरिष्ठ पदाधिकारी ही जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडू शकतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधणे, स्थानिक प्रश्नांवर आंदोलने उभी करणे आणि जनतेमध्ये पक्षाची उपस्थिती जाणवून देणे ही काळाची गरज आहे. गेल्या काही काळात महाविकास आघाडीतील काँग्रेसने विविध प्रश्नांवर आंदोलने केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते रोहित पवार यांनी अनेक विषयांवर आक्रमक भूमिका घेतली. मात्र, शिवसेनेकडून स्वतंत्र आणि मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभे राहिल्याचे फारसे दिसले नाही. केवळ इतर पक्षांच्या आंदोलनांना पाठिंबा देऊन स्वतःची राजकीय ऊर्जा निर्माण करता येत नाही. प्रत्येक पक्षाला स्वतःची ओळख, स्वतःचा संघर्ष आणि स्वतःचे कार्यक्रम आवश्यक असतात. मातोश्रीवरील बैठकीत उद्धव ठाकरे यांनी खासदारांना शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासह काही महत्त्वाच्या सूचना केल्याचे सांगितले जाते. या सूचना योग्य असल्या तरी त्यांना जनआंदोलनाचे स्वरूप देणे आवश्यक आहे. कारण केवळ बैठका, मार्गदर्शन किंवा पत्रकार परिषदांमधून पक्ष जिवंत राहत नाही. कार्यकर्त्यांना मैदानात उतरवणारे कार्यक्रम आणि नेतृत्वाची प्रत्यक्ष उपस्थिती यामुळेच संघटन बळकट होते. राज्यातील नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी विविध भागांचे दौरे केले होते. त्याचा परिणाम त्यांच्या पक्षाच्या वाढत्या स्थानिक उपस्थितीत दिसून आला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मजबूत पाया निर्माण करणे हेच पुढील विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांचे आधारस्थान असते. त्यामुळे आगामी काळात ठाकरे गटानेही या पातळीवर नव्याने नियोजन करण्याची गरज आहे. राजकारणात सत्ताधारी पक्षाकडे झुकाव होणे ही नवीन बाब नाही. सत्ता, संसाधने, विकासकामांची गती आणि राजकीय भवितव्य यांचा विचार करून अनेक नेते निर्णय घेतात. त्यामुळेच 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना खतपाणी मिळत आहे. एकनाथ शिंदे यांनी अशा कोणत्याही मोहिमेचे अस्तित्व नाकारले असले, तरी त्यांच्या पक्षाकडे येऊ इच्छिणाऱ्या नेत्यांसाठी दरवाजे खुले असल्याचे संकेत त्यांनी अनेकदा दिले आहेत. या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी एक मूलभूत प्रश्न उभा राहतो. शिवसेनेने आगामी काळात स्वतःला कसे उभे करायचे? विरोधी पक्ष म्हणून केवळ सरकारवर टीका करणे पुरेसे ठरणार नाही. जनतेच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून संघर्ष करणे, नवीन नेतृत्व घडवणे, कार्यकर्त्यांशी सातत्याने संवाद राखणे आणि राज्यव्यापी संघटन उभी करणे या गोष्टी अपरिहार्य आहेत. संजय राऊत यांनी 'ऑपरेशन टायगर'ला उत्तर म्हणून 'ऑपरेशन लांडगा'ची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात कोणत्याही राजकीय पक्षासाठी सर्वात महत्त्वाचे ऑपरेशन म्हणजे पक्षसंघटना मजबूत करण्याचे ऑपरेशन होय. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसमोर हेच सर्वात मोठे आव्हान आहे. पक्ष टिकवायचा असेल, वाढवायचा असेल आणि पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी शक्ती म्हणून उभे राहायचे असेल, तर राजकीय ऑपरेशनच्या चर्चांपेक्षा संघटनात्मक पुनर्बांधणीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार आहे. कारण अखेरीस राजकारणात अफवा, चर्चा आणि ऑपरेशन्सपेक्षा जनाधार आणि संघटनशक्तीच निर्णायक ठरत असते.

# एल निनोच्या संकटात शेतकऱ्यांनी घाबरू नये

## • वैज्ञानिक आणि नियोजनबद्ध पद्धतीने शेतीचे व्यवस्थापन करावे-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी होणे,पावसात खंड पडणे तसेच उष्णतेची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.या पार्श्वभूमीवर आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना योग्य नियोजन करून खरीप हंगामाचे व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले आहे.

आ. धस म्हणाले की, बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. शेततळी, विहिरी,बंधारे आणि जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांद्वारे पावसाचे पाणी साठवून ठेवण्यावर भर द्यावा.तसेच कोरडवाहू क्षेत्रात कमी कालावधीची,दुष्काळ सहनशील आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांच्या वाणांची निवड करावी. एल निनोच्या संभाव्य परिणामांवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी पावसाच्या आगमनानुसार टप्प्याटप्प्याने पेरणी करावी, बियाणे प्रक्रिया करूनच पेरणी करावी,तसेच ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद व तीळ यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य द्यावे. आंतरपीक पद्धतीचा अवलंब,सेंद्रिय खतांचा वापर, पीक अवशेषांचे आच्छादन (मल्चिंग), ठिबक व तुषार सिंचनाचा वापर यामुळे कमी पावसाच्या परिस्थितीतही पीक उत्पादन टिकवून ठेवता येऊ शकते, असे आ.धस सांगितले. याशिवाय हवामान आधारित कृषी सल्ल्याचे नियमित पालन करणे,पावसात दीर्घ खंड पडल्यास जीवनरक्षक सिंचनाची व्यवस्था करणे आणि पीक विमा योजनांचा लाभ घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. आ. धस यांनी कृषी विभाग,कृषी विज्ञान केंद्र आणि संबंधित यंत्रणांना शेतकऱ्यांपर्यंत हवामान आधारित सल्ला,दर्जेदार बियाण्यांची उपलब्धता आणि तांत्रिक मार्गदर्शन वेळेवर पोहोचविण्याच्या सूचना दिल्या आहेत. ''शेतकऱ्यांनी घाबरून न जाता वैज्ञानिक आणि नियोजनबद्ध पद्धतीने शेतीचे व्यवस्थापन केल्यास एल निनोच्या संभाव्य परिणामांवर मोठ्या प्रमाणात मात करता येईल,'' असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.



जालनाचे नवनियुक्त अप्पर पोलीस अधिक्षक मा. विक्रम जी साळी साहेब यांची आज दैनिक राज्य लोकतंत्र च्या जालना शहर प्रतिनिधी गणेश नवपुते यांनी भेट घेऊन सदिच्छा दिल्या व पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांचा विरोध

करण्यात येईल, असे अधिसूचनेत नमूद केले आहे. वर्धा, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १३ जिल्ह्यातील काही गावांचा यात समावेश आहे.

**शेतकऱ्यांनी नांदेड-हिंगोली महामार्ग रोखला**

नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाच्या प्रस्तावाविरोधात कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर परिसरातील शेतकऱ्यांनी मंगळवारी (दि.१६) कांडली फाटा येथे जोरदार शक्तिप्रदर्शन करत शक्तीपीठ महामार्गाच्या प्रस्तावाला तीव्र विरोध करत शासनाला इशारा दिला. मंगळवारी सकाळी ११ ते १२ या वेळेत नांदेड-हिंगोली महामार्गावर परिसरातील शेतकरी व सर्वपक्षीय नेत्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी महामार्गाच्या दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. सुमारे एक तास वाहतूक ठप्प झाली होती. महामार्गामुळे सुपीक शेती नष्ट होणार असून शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर परिणाम होणार असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

-----------

### तुकाराम मुंढेंची पुन्हा

कारवाई करण्यात येत आहे. तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कारकिर्दीत वारंवार बदल्या झाल्याची नोंद आहे. गेल्या २१ वर्षांत त्यांची तब्बल २५ वेळा बदली झाली आहे. अनेकदा एका पदावरील कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची बदली करण्यात आली. त्यांच्या कडक आणि तडजोड न करणाऱ्या कार्यपद्धतीमुळे अनेकदा वाद निर्माण झाले असून, त्यातूनच बदल्यांचे निर्णय झाल्याची चर्चा कायम राहिली आहे. दरम्यान, एफडीएमधील सध्याच्या धडक कारवायांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या बदलीच्या चर्चांनी जोर धरला असला, तरी सरकारकडून याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

----------

### शेतकऱ्यांनो पेरणीची घाई

१ जून ते १५ जून या कालावधीत १०३.८ मिमीच्या सामान्य पावसाच्या तुलनेत २७.४ मिमी पावसाची नोंद झाली. अहवालानुसार, राज्यभरात भात आणि नाचणीसाठी रोपवाटिका तयार करणे आणि पेरणीपूर्व शेतीची कामे यासारखी कृषी मशागतीची कामे सुरू आहेत. जूनच्या मध्यापर्यंत पाऊस कमी राहण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांना पेरणीची घाई न करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अहवालानुसार, कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये पाऊस तुरळक राहण्याची शक्यता आहे, तर विदर्भ आणि मराठवाड्यात १८ जूनपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवसांत विदर्भाच्या काही भागांमध्ये उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंत्रिमंडळाने मान्सूनला होणारा विलंब आणि कमी होत असलेल्या पाणीसाठ्याबद्दल चिंता व्यक्त केली, तसेच पाण्याचा जपून वापर करण्याच्या गरजेवर भर दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थापनासाठी कृती आराखडा तयार करण्यास सांगितले आहे.

------------

### वाळू घोटाळा प्रकरणी १९ जणांवर गुन्हे,

स्वतंत्र चौकशी करण्यात आली असून त्याचा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. पुढील निर्णय शासन स्तरावरून होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार कारवाईला सुरुवात करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात तलाठी किरण दांडगे, तलाठी गोविंद ढाकणे, कोतवाल शुभम गायकवाड, कंत्राटी कर्मचारी विश्वजित शेवडे यांच्यासह इतर संबंधितांविरोधात नायब तहसीलदार संजय सोनवणे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, ईटीपीच्या ओटीपीचा गैरवापर करून अवैध वाळू उपसा केल्याप्रकरणी सुमारे १५ खासगी व्यक्तींवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहनधारकांवर जवळपास ९० कोटी रुपयांचा दंड आकारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. याशिवाय, इतर संबंधितांवर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, गेवराई मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी यापूर्वी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश देत कारवाईचा मार्ग मोकळा केला. सध्या चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रारींची नोंद व पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. राक्षसभुवन घरकुल वाळू घोटाळ्यात १९ जणांवर गुन्हे दाखल; १९ हजार ब्रास अतिरिक्त वाळू उपसा उघड, तर वाहनधारकांवर सुमारे ९० कोटींच्या दंडाची प्रक्रिया सुरू.

---------------

### शिवसेना ठाकरे गटाचे

थांबवण्यासाठी ठाकरे गटाचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या ऑपरेशन टायगरची चर्चा जोरदार सुरू आहे. शिवसेना पक्षाचा वर्धापन दिन जवळ येत असताना या चर्चा आणखीच जोर धरू लागल्या. या पार्श्वभूमीवर ऑपरेशन टायगर थांबवण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाने जोरदार प्रयत्न सुरू केल्याचे समजते. यासाठी ठाकरे गटाचे वरिष्ठ नेते सर्व खासदारांशी संपर्क करत असून त्यांच्याशी संवाद साधत असल्याचेही समजते. ऑपरेशन टायगर अंतर्गत ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार शिंदेच्या शिवसेनेत दाखल होणार असल्याच्या चर्चा जोर धरत आहेत. मात्र ऑपरेशन टायगर यशस्वी होऊ नये यासाठी ठाकरे गटाच्या नेत्यांकडून प्रयत्न सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ठाकरे गटातील पहिल्या फळीतील नेते पक्षाच्या सर्व खासदारांशी संपर्क साधत आहे. प्रत्येकाशी वैयक्तिक संपर्क साधून त्यांच्याशी चर्चा केली जात आहे. या चर्चेतून पुढे येणारी खासदारांची मते पक्ष नेतृत्वाला कळवली जाणार आहेत. ऑपरेशन टायगरच्या चर्चा जोर धरत असताना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मैदानात उतरले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार उद्धव ठाकरे स्वतः देखील खासदारांसोबत संपर्क साधत आहेत. त्यांच्याशी चर्चा करत आहेत. ऑपरेशन टायगर अंतर्गत जे खासदार जाऊ शकतात त्यांनी मंत्रिपद मागितल्याची देखील चर्चा आहे. ठाकरेंच्या शिवसेनेमधून फुटणाऱ्या गटाला मंत्रिपद देण्याचा शब्द दिल्याची चर्चा देखील आहे. मात्र मंत्री कोण होणार, यावर फुटणाऱ्या गटात रस्सीखेच असल्याचे समजते.

-----------

### आता कौटुंबिक वाटणीची

वाटणीची मोजणी प्रति पोटहिस्सा अवघ्या २०० रुपयांत केली जाणार आहे. या नवीन नियमांनुसार, नियमित मोजणी ९० दिवसांत तर द्रुतगती (फास्ट ट्रॅक) मोजणी ३० दिवसांत पूर्ण करणे भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आलं आहे. यामुळे मोजणीसाठी महिनेन्महिने कार्यालयाचे उंबरठे झिजवणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. नवीन नियमावलीत अर्जदार आणि मोजणी अधिकारी दोघांच्या उत्तरदायित्वाबाबत स्पष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत.

----------

### पीएम नरेंद्र मोदी-डोनाल्ड

भेट झाली नव्हती. त्यामुळे ही भेट विशेष महत्त्वाची मानली जात आहे. भारत-अमेरिका संबंध, व्यापार, संरक्षण सहकार्य तसेच इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सामरिक भागीदारी या मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे विशेष लक्ष लागले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, १७ जून रोजी मोदी आणि ट्रम्प यांच्यात स्वतंत्र द्विपक्षीय चर्चा होण्याची शक्यता आहे. या चर्चेत भारत-अमेरिका व्यापार संबंध अधिक बळकट करणे, संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढविणे आणि क्वाड सहकार्य अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाऊ शकतो. आंतरराष्ट्रीय घडामोडींवर लक्ष ठेवणाऱ्या तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर मोदी-ट्रम्प यांची ही सकारात्मक भेट भारत-अमेरिका संबंधांना नवी चालना देण्याबरोबरच जी-७ सदस्य देशांमधील समन्वयालाही बळकटी देऊ शकते. दरम्यान, या शिखर परिषदेत अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, इटली, जपान, कॅनडा आणि फ्रान्ससह भारतासह अनेक प्रमुख देशांचे नेते सहभागी झाले आहेत. जागतिक अर्थव्यवस्था, हवामान बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता नियमन, मध्य पूर्वेतील परिस्थिती आणि युक्रेन संकट हे परिषदेतील प्रमुख चर्चेचे विषय आहेत

-----------

### लाडक्या बहिणींच्या खात्यात

प्रक्रियेद्वारे मे महिन्याचा हप्ता जमा केला जात आहे. यासाठी १० जून रोजी ३४४ कोटी रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली होती. शासनाच्या आकडेवारीनुसार, या योजनेसाठी राज्यभरातून सुमारे अडीच कोटी अर्ज प्राप्त झाले होते. गेल्या दीड वर्षांपासून अर्जांची सखोल छाननी आणि पडताळणी करण्यात आली. ३० एप्रिलपर्यंतची अंतिम प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्यातील सुमारे १ कोटी ७७ लाख महिला पात्र ठरल्या आहेत. तर निकषांची पूर्तता न झाल्याने सुमारे ७० लाख अर्ज अपात्र ठरवण्यात आले आहेत. अर्जांची तपासणी करताना उत्पन्नाची मर्यादा, कुटुंबाची माहिती, इतर शासकीय योजनांचा लाभ तसेच आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये वार्षिक उत्पन्न निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त असणे, ई-केवायसी अपूर्ण राहणे, दुबार अर्ज, चुकीची माहिती, अपूर्ण कागदपत्रे, आधार-बँक खाते लिंक नसणे आणि मोबाईल क्रमांकातील बदल यांसारख्या कारणांमुळे अनेक अर्ज बाद करण्यात आले. मे महिन्याचा हप्ता जमा होण्यास सुरुवात झाली असली तरी तांत्रिक कारणांमुळे किंवा सर्व्हरवरील ताणामुळे अनेक लाभार्थींना बँकेकडून रकमेचा एसएमएस प्राप्त झालेला नाही. त्यामुळे लाभार्थींनी अनावश्यक चिंता न करता आपल्या बँकेचे अधिकृत मोबाईल ॲप, बँक स्टेटमेंट किंवा पासबुक अपडेट करून खात्यात रक्कम जमा झाली आहे का, याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

-----------

### रोहित दादा शेतकऱ्यांना

फलित काय हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अद्यापही समजले नाही. कारण अन्नत्याग आंदोलन मागे घेतल्यानंतर शेतकऱ्यांना नेमका फायदा काय झाला. सरसकट पूर्ण कर्जमाफी झाली का हे सर्व प्रश्न आजही अनुत्तरणीय आहेत. जर शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडले नसेल तर मग हे अन्नत्याग आंदोलन राजकीय स्वार्थासाठी होते की शेतकऱ्यांसाठी हा देखील मोठा प्रश्न आहे. प्रामुख्याने उपोषणाची सांगता झाल्यानंतर ज्या काही शेतकऱ्या विषयीच्या मागण्या सरकारने मान्य केल्या त्या शेतकऱ्यांना सांगणे गरजेचे होते मात्र काय मागण्या मान्य केल्या हे देखील अद्याप समजू शकले नाही, त्यामुळे आता शेतकरीच म्हणत आहेत, दादा उपोषणांमधून काय मिळाले पंढरपूरचा बुक्का की तुमच्या राजकीय नेते पदाची वाटचाल. पण या अन्नत्याग आंदोलनामुळे राज्यातील राजकारण ढवळून निघण्याच्या मार्गावर होते. अनेक विविध संघटना, शेतकऱ्यांच्या संघटना या आंदोलनाला पाठिंबा देत होत्या. आंदोलन व्यापक होण्यापूर्वीच शांत झाल्याने शेतकऱ्यांमध्येही थोडीशी नाराजी दिसून आली.

## पान ६ वरून...

### बीड शहरामध्ये मातंग क्रांती मोर्चाचा

कृती आराखडा जाहीर करण्यात यावा. जोपर्यंत अनुसूचित जातीतील अ, ब, क, ड आरक्षण उपवर्गीकरण लागू होत नाही, तोपर्यंत शासनाने मेगाभरती व इतर नोकरभरती प्रक्रिया स्थगित ठेवावी. तसेच नोकरी, उद्योग, व्यवसाय, शिक्षण व आर्थिक लाभांमधील मातंग समाजाचा आजपर्यंतचा अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, यास अन्य मागण्यांचा समावेश जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनामध्ये करण्यात आला आहे.

---------------

### बीड मधील बळीराजा

शर्ती टाकुन फसवी घोषणा फडणवीसांनी केली आहे. या कर्जमाफीचा शेतक-यांना लाभ मिळुच शकत नाही म्हणुन झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी व लबाड सरकारला वठणीवर आणण्यासाठी आजची बळीराजा गर्जना ट्रॅक्टर रॅली आहे. शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, स्टेडीअम कॉम्प्लेक्स पासुन सुरू झालेल्या या रॅलीत भरपुर ट्रॅक्टर, शेकडो शेतकरी, शिवसैनिक आणि पदाधिकारी सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकलेल्या या ट्रॅक्टर रॅलीतुन सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. रॅलीच्या समारोपावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या सह बीड तालुकाप्रमुख गोरख आण्णा शिंगण, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, जिल्हा संघटक रतन गुजर, सहकार सेना जिल्हाप्रमुख गणेश जाधव माजी तालुका प्रमुख अंबाजोगाई मदन परदेशी यांची समायोचीत भाषणे झाली या रॅलीमधे उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, तालुका सचिव नंदु येवले, उपतालुका प्रमुख ज्ञानोश्वर काशिद, तालुकासहसचिव संदिप भानप, पदवीधर जिल्हा समन्वयक बागवाण सर, युवासेना तालुका प्रमुख बारीकराव येवले, युवानेते मुकेश घुमरे, सर्कलप्रमुख, विभागप्रमुख, शाखाप्रमुख यांच्यासह पदाधिकारी व हजारो शेतकरी उपस्थित होते.

-------------

### फसव्या कर्जमाफी विरोधात शिरूर मध्ये

गळ्यात दगड बांधण्याचा प्रकार आहे वास्तवात शेतकऱ्यांना न्याय देण्याची गरज आहे त्यामुळे कर्जमाफीतील अन्यायकारक अटी व शर्ती रद्द कराव्यात व शेतकऱ्यांना विना अट शर्ती सरसकट कर्जमाफी देण्यात यावी या प्रसंगी बोलताना माजी जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांनी म्हटले की महायुती सरकार शक्तिपीठ महामार्गाला हजारो कोटी रुपये खर्च करत आहे पण शेतकऱ्यांना कर्जमाफी देताना अटी व शर्ती लावते तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे साहेब यांनी शेतकऱ्यांची वेदना समजून विना अट शर्ती ची दोन लाखापर्यंत सरसकट कर्जमाफी दिली होती या वेळी बोलताना उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर म्हणाले की शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे स्वतः रक्ताचे पाणी करून तो धान्य पिकवतो त्यामुळे आपण चार घास खाऊ शकतो त्यामुळे संकटात अडकलेला शेतकऱ्यांना विना अट शर्ती ची कर्जमाफी देण्यात यावी सदरील आंदोलनाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार यांनी केले तेसेच तालुका प्रमुख सोपान मोरे, किसान सेना तालुका प्रमुख हरी मामा खेडकर, महिला संघटिका मीरा नवले, ठकसेन तुपे यांनी मनोगत व्यक्त केले या वेळी उपजिल्हा प्रमुख नारायण सातपुते, दीपक मोराळे , शिवाजी कुलकर्णी, तालुकाप्रमुख , सुभाष राऊत, मुकुंद शिंदे, अजय दाभाडे, अशोक जाधव, भोजराज पालीवाल, श्रीधर गरड, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, , , प्रवीण घाटे, सुमित घाडगे, शेख सिराज, शेख कलीम, बंडू तळेकर, नवनाथ प्रभाळे, रवी वाघमारे, गणेश लोणकर, सतिशसिंह परदेशी, रवी भोसकर, रंगनाथ पैठणकर , आसाराम बारगजे, केशव बारगजे, चव्हाण टेलर, राजेश कोकणे संजय सानप इत्यादी शिवसैनिक, शिवसेना पदाधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------

### अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेणे

अन्वये अल्पवयीन मुलीला फूस लावून, पळवून नेणे किंवा तिच्यासोबत पळून जाणे हा अतिशय गंभीर आणि दंडनीय गुन्हा मानला गेला आहे. या गुन्ह्यासाठी कायद्यात तब्बल ७ वर्षांपर्यंतच्या कडक कारावासाची आणि दंडाची तरतूद करण्यात आली आहे. एका चुकीच्या निर्णयामुळे संपूर्ण आयुष्याची कशी धूळधाण उडू शकते, याकडे पोलिसांनी या मोहिमेच्या माध्यमातून लक्ष वेधले आहे. अशा गुन्ह्यांमध्ये अडकल्यास तरुणांवर पोलीस केस होऊन कायमचा गुन्हेगारी रेकॉर्ड तयार होतो, ज्यामुळे शिक्षण, नोकरी आणि भविष्यातील चांगल्या संधींवर कायमची संक्रांत येते.या समस्येचे कौटुंबिक आणि मानसिक परिणामही गंभीर आहेत. अशा घटनांमुळे कुटुंबांचा समाजातील मान-सन्मान धुळीस मिळतो, तर दुसरीकडे नात्यांमध्ये कायमची दरी निर्माण होते. कायद्याच्या कचाट्यात सापडल्यानंतर तरुणांना तीव्र मानसिक ताण, नैराश्य आणि पश्चात्तापाचा सामना करावा लागतो, तर दुसरीकडे अल्पवयीन मुलींचे संपूर्ण भविष्य आणि शिक्षण धोक्यात येते.उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांनी तरुणांना आवाहन करताना सांगितले की, वयाच्या या टप्प्यावर भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. शिक्षण, करिअर आणि स्वतःचे ध्येय पूर्ण करण्याला तरुणांनी पहिले प्राधान्य दिले पाहिजे. कोणत्याही प्रकारची समस्या, मानसिक गोंधळ किंवा दडपण असल्यास तरुणांनी तात्काळ आपल्या घरातील विश्वासू व्यक्ती, शिक्षक किंवा थेट पोलिसांशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे. या प्रक्रियेत पालकांची भूमिका महत्त्वाची असून त्यांनी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवावा. मुलांच्या बदलत्या वागणुकीवर, त्यांच्या ऑनलाईन हालचालींवर आणि मोबाईलच्या वापरावर पालकांनी बारीक पण विश्वासाचे लक्ष ठेवावे, जेणेकरून मुलांचे भविष्य सुरक्षित राहील असे आवाहन शिंदे यांनी नमूद केले आहे.

-------------

### श्रावणापूर्वी परळीतील ८४ खोल्यांचे

८४ खोल्यांचे भक्तनिवास अपूर्ण अवस्थेत पडून आहे.या पार्श्वभूमीवर ही बाब धनंजय मुंडे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल घेत संबंधित कंत्राटदाराला उर्वरित कामे युद्धपातळीवर पूर्ण करून भक्तनिवास वैद्यनाथ देवस्थान समितीच्या ताब्यात देण्याच्या सूचना दिल्या. याअनुषंगाने माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ देवस्थान समितीचे विश्वस्त राजेश देशमुख, गटनेते वैजनाथ सोळंके, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे आणि तीर्थक्षेत्र विकास योजनेचे कंत्राटदार जे. के. कन्स्ट्रक्शनचे संचालक जाफर खान यांनी संयुक्तपणे भक्तनिवासाची पाहणी केली. श्रावण महिना सुरू होण्यापूर्वी भक्तनिवास देवस्थान समितीच्या ताब्यात देण्यासाठी आवश्यक नियोजन यावेळी निश्चित करण्यात आले. कंत्राटदार जाफर खान यांनीही उर्वरित सर्व कामे श्रावणापूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. भक्तनिवास सुरू झाल्यानंतर परळी येथे दर्शनासाठी येणाऱ्या शिवभक्तांना व भाविकांना अत्यंत माफक दरात निवासाची सुविधा उपलब्ध होणार असून तीर्थक्षेत्राच्या विकासाला चालना मिळणार आहे. यामुळे भाविकांची गैरसोय दूर होऊन धार्मिक पर्यटनालाही मोठी मदत होणार आहे.

-------------

### बीड एलसीबीची मोठी कारवाई: ६ दुचाकींसह

शाखेचे श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णू सानप, गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे आणि चालक अतुल हराळे यांनी केली आहे.

------------


**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर का, जि. बीड**

Email.tahsildarshirurkasar@gmail.com दुरध्वनी क्रमांक-०२४४४-२५९३५९

क्र.२०२६/विलंब जन्म नोंद/प्र.क्र.१४९/२०२६/कावि-४११ दि.१५/०६/२०२६

**विलंब जन्म नोंद जाहीर प्रगटन**

मा.तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९, (सुधारीत २०२३) च्या कलम १३ (३) अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेणे बाबत

ज्या अर्थी अर्जदार मिठू उत्तम माने, रा.मार्कडवाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी स्वतःची मुलगी नामे राजश्री मिठू माने हिचा जन्म दिनांक २३/०६/२०२३ रोजी मार्कडवाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून नियमानूसार अर्जाची सुनावणी घेउन विलंबाने जन्म नोंद घेणे बाबत आदेश केला जाईल.

स्वाक्षरीत/-

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार**

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.१७ जून २०२६




बीड : दैनिक वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रसिद्ध होताच प्रशासनाने तात्काळ दखल घेत श्री खंडोबा दीपमाळ मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील साचलेला कचरा व घाण उचलण्याच्या कामाला सुरुवात केली.

# शाळा प्रवेशोत्सवाचा इव्हेंट करण्यात प्रशासन दंग

## मोडकळीस आलेल्या शाळांकडे मात्र फिरवली पाठ ! जिल्हाधिकारी व सीईओ धोकादायक मोडकळीस आलेल्या शाळांना भेटी कधी देणार

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी ''शाळा प्रवेशोत्सव'' आणि ''१०० शाळांना भेटी'' हा विशेष उपक्रम मोठ्या उत्साहात राबविला. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विविध शाळांना भेटी देत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले, प्रभातफेऱ्यांमध्ये सहभाग घेतला आणि छायाचित्रण सत्रे पार पाडली. मात्र दुसरीकडे बीड जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा गेल्या अनेक वर्षांपासून मोडकळीस आलेल्या अवस्थेत असून, विद्यार्थी व शिक्षक जीव मुठीत धरून शिक्षण घेत आहेत. ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि सामाजिक संघटनांनी वारंवार निवेदने, आंदोलने आणि मागण्या करूनही प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.



डॉ. ढवळे म्हणाले की, शाळा प्रवेशोत्सव हा स्वागतार्ह उपक्रम असला तरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेपेक्षा फक्त ''इव्हेंट'' आणि ''फोटोसेशन'' यांनाच प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्ह्यातील धोकादायक आणि मोडकळीस आलेल्या शाळांना भेट देऊन त्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. पाटोदा तालुक्यातील चिंचोली येथील जिल्हा परिषद शाळेची एका बाजूची भिंत मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोसळली होती. मुख्याध्यापक आणि ग्रामस्थांनी अनेकदा निवेदने दिली, मात्र वर्षभर उलटूनही साधी संरक्षणभिंत उभारण्यात आलेली नाही. या शाळेत इयत्ता १ ली ते ४ थीपर्यंत सुमारे १०० विद्यार्थी शिक्षण घेत असून ३ शिक्षक कार्यरत आहेत. केज तालुक्यातील तरनळी येथील सानप वस्ती शाळेच्या स्लॅबचे प्लास्टर कोसळल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून प्रशासनाने अद्याप ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही. आष्टी तालुक्यातील हरिनारायण आष्टा येथील पीएमश्री शाळेत माध्यमिक विभागासाठी गणित व विज्ञान विषयाचे शिक्षक उपलब्ध नसल्याने संतप्त पालकांनी शाळेला कुलूप ठोकण्याचा निर्णय घेतला होता. एकीकडे केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये शाळांचा समावेश केला जात असताना दुसरीकडे मूलभूत शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे वास्तव समोर येत आहे. ''जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रवेशोत्सवासाठी निवडक शाळांना भेटी दिल्या. आता त्यांनी मोडकळीस आलेल्या, शिक्षकविरहित आणि धोकादायक शाळांनाही भेट देऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षित शिक्षणासाठी ठोस निर्णय घ्यावेत. अन्यथा हा उपक्रम केवळ दिखाऊपणा आणि फोटोसेशनपुरताच मर्यादित राहील,'' असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

## ॲड. माधव शेंडगे आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित!

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील मौजे परडी माटेगाव ग्रामपंचायतचे सरपंच ॲड. माधव शेंडगे यांना नुकताच लोकमत समूहाचा आदर्श सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. गावातील केलेल्या विकास कामाचा कायापलट यासह अन्य विविध कामांची दखल घेऊन हा पुरस्कार दिला आहे.दि.१३ वार-शनिवार रोजी बीडमध्ये विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा पार पडला आहे. ॲड. माधव शेंडगे हे उच्चशिक्षित, अभ्यासू आणि दूरदृष्टी लाभलेले परडी-माटेगाव ग्रामपंचायतीला एकमेव सरपंच आहेत. खितपत पडलेल्या गावाला विविध विकास कामे मंजूर करून आणून गावचा कायापालट करण्यात ॲड. माधव शेंडगे यांना यश आले आहे. यामध्ये



गाव विकासात स्वच्छता, आरोग्य, सुशासणयुक्त ग्रामपंचायत, सिसिटिव्ही, स्मशानभूमीत सुशोभीकरण, दोन पाणी पुरवठा योजना, चार आरओ प्लॅन्ट, सर्वसामान्य ग्रामस्थांपर्यंत प्रत्येक योजना पोहचवणे,अशी अनेक कामे गावकरी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, सेससो संचालक, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत चे सर्व कर्मचारी,आरोग्य विभागाचे कर्मचारी,शिक्षक वृंद यांच्या सहकार्यातून पुर्ण करत आहेत. अशी काम करत असल्यामुळेच मुखमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ग्रामपंचायतला दुसरा क्रमांक मिळाला असून लवकरच याचे वितरण पुरस्कार मिळणार आहे. याच कामाची दखल घेऊन लोकमत समूहाने बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत परडी माटेगावचे सरपंच ॲड. माधव शेंडगे यांना आदर्श सरपंच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्काराने वडवणी तालुक्यासह ग्रामस्थांची मान उंचावली आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल लोकमत समूहाचे आभार मानण्यात आले आहेत. तर सरपंच ॲड. ॲड. माधव शेंडगे यांचे विविध घटकांमधून स्वागत, अभिनंदन आणि सत्कार होत आहेत.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये प्रथम दिनाचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



पाटोदा । प्रतिनिधी

शहरात असणाऱ्या इयत्ता पहिली ते चौथीच्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये संस्थेचे सचिव योगेश भैय्या क्षीरसागर तथा गटनेत्या सारिका ताई शिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक मोरे सर, विभाग प्रमुख सौ वीर मॅडम तथा सहशिक्षक माताडे सर व श्रीमती शेलार मॅडम यांच्या नियोजनातून शाळेचे शैक्षणिक वर्ष २०२६ २७ या शैक्षणिक प्रवेशोत्सवाची सुरुवात आज प्रथम दिनी शाळेत दाखल झालेल्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत सत्कार करून करण्यात आली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संत बाळूदेव विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री बोखारे सर व पाटोदा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल जायभाय सर हे उपस्थित होते तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे श्रीकांत लांडगे पालक वर्गातून श्री गणेश रावजी खाडे श्री महादेव मार्कड हे यावेळी उपस्थित होते.. प्रथम शाळेत नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्याचे ऑप्शन करून पुष्पहार तथा पुस्तक देऊन त्याचे स्वागत करण्यात आले यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुण्यांनी पाटोदा शहरांमध्ये अत्यंत दर्जेदार असणारी प्राथमिक शिक्षण देणारी ही शाळा आहे असा उल्लेख केला .. शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## ''स्मार्ट मीटरच्या नावाखाली जनतेवर अन्याय –उद्धव मडके

गेवराई । प्रतिनिधी



महावितरणकडून नागरिकांच्या संमतीशिवाय जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवण्याच्या प्रकाराविरोधात शिवसेना आक्रमक झाली असून तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके यांनी या निर्णयाविरोधात जोरदार आंदोलनाचा इशारा दिला आहे. ''स्मार्ट मीटर लावण्याच्या नावाखाली सामान्य जनतेची लूट सुरू आहे. आधीच व्यवस्थित चालणारे मीटर बदलण्याची गरज काय?'' असा थेट सवाल उद्धव बापू मडके यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, ग्राहकांची परवानगी न घेता मीटर बदलणे हा कायद्याचा भंग आहे. वीज कायदा २००३ आणि नियमांनुसार मीटर बदलण्यापूर्वी ग्राहकाला नोटीस देणे बंधनकारक आहे. तसेच २०२३ च्या परिपत्रकानुसार स्मार्ट मीटर बसवण्यासाठी ग्राहकाची संमती आवश्यक आहे.

शिवसेनेची भूमिका स्पष्ट: संमतीशिवाय मीटर बसवणे थांबवा नागरिकांना आधी नोटीस द्या जुना मीटर व्यवस्थित असल्यास बदल करू नका वाढीव बिलांच्या माध्यमातून आर्थिक लूट बंद करा कायदेशीर लढाईची तयारी: उद्धव बापू मडके यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की प्रत्येक वीज ग्राहकाने लेखी तक्रार करावी ग्राहक तक्रार निवारण मंच () येथे अर्ज करावा गरज पडल्यास न्यायालयात जाऊन स्टे घ्यावा वीज लोकपाल यांच्याकडे तक्रार दाखल करावी ''हे सगळं फक्त मोठ्या कंपन्यांचे घर भरण्यासाठी चाललेलं षडयंत्र आहे. आम्ही सामान्य जनतेच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरणार,'' असा इशारा त्यांनी दिला. मोहीम सुरू: शिवसेनेतर्फे ''स्मार्ट मीटर विरोध'' मोहीम राबवण्यात येणार असून प्रत्येक २० ग्राहकांनी एकत्र येऊन सामूहिक तक्रार दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ''जनतेचा हक्क हिरावून घेणाऱ्या कोणत्याही निर्णयाला शिवसेना कडाडून विरोध करेल,'' असे ठाम मत उद्धव बापू मडके यांनी व्यक्त केले.

## जि.प. प्राथमिक शाळा औरंगपूर कुकडा (दगडगाव) येथे 'प्रवेशोत्सव'

बीड । प्रतिनिधी

येथील जि.प. प्राथमिक शाळा औरंगपूर कुकडा येथे नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत अत्यंत उत्साही आणि नाविन्यपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावर्षीच्या 'प्रवेशोत्सव' कार्यक्रमात पहिलीच्या विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे, वेगवेगळ्या क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या वेशभूषेत असलेले विध्यार्थी. शाळेतील शिक्षिका श्रीम. नाईकनवरे विजयमाला बळीराम यांच्या विचारातून शाळेचे मुख्याध्यापक श्री. महादेव कारंडे यांच्या सहकार्याने हा आगळा वेगळा उपक्रम राबवला. पहिलीच्या विद्यार्थ्यांना डॉक्टर, पोलीस, पायलट, आर्मी आणि एअर हॉस्टेस यांसारख्या विविध क्षेत्रांतील अधिकार्यांच्या वेशभूषेत सजवले होते.फक्त सजवलेच नाही तर त्यांच्या



हातात मी बनणार डॉक्टर, मी बनणार पायलट, पोलीस, आर्मी, वकील असे ध्येय फलक दिले.. हे हातातील फलक पाहून आईवडिलांचं काळीज आणखीनच मोठं झालं. त्यानंतर, सजवलेल्या बैलगाडीतून या बालकांची वाजत-गाजत संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात आली.त्यांचबरोबर उपस्थित महिलांनी त्यांचे औक्षण केले. हातातील ध्येय फलकाची प्राप्ती व्हावी असा आशीर्वाद देऊन शुभेच्छा दिल्या.बालकांच्या या आगळ्यावेगळ्या रूपाने आणि उत्साहाने गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. पालकांनी आपल्या पाल्यांना अशा विविध वेशभूषेत पाहून आनंद व्यक्त केला. शाळेचे मुख्याध्यापक श्री. महादेव बाबासाहेब कारंडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून शालेय परिसर उत्साही ठेवण्यासोबतच, पालकांशी संवाद साधून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा हा उपक्रम राबवल्याचे कौतुक उपस्थितांनी केले.

## अखेर सहाव्या दिवशी पत्रकारांना न्याय मिळाला! पत्रकारांना दिले अहवाल पत्र

पात्रुड । प्रतिनिधी

येथील वादग्रस्त ग. नं १०५ मधील प्लॉट स्वतःच्या पत्नी व नातेवाईकांच्या नावे खरेदी केल्याप्रकरणी ग्राम महसुल अधिकारी रुपचंद आभारे यांच्या संदर्भात माजलगाव महसूल मंडळधिकारी यांनी तहसीलदार यांना दिलेल्या अहवालानुसार शिस्तभंगाची कारवाई व फौजदारी गुन्हे दाखल करुन कायमस्वरूपी सेवेतून मुक्त करण्याच्या मागणीसाठी दि १० जुन रोजी पासुन माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर पत्रकारांचे बेमुदत धरणे आंदोलन सुरू असुन हे आंदोलन दि १५ जुन सोमवार रोजी साहव्या दिवशीही अखेर पत्रकारांना न्याय मिळाला वरील प्रकरणी उपविभागीय अधिकाऱ्यांनी तलाठी रूपचंद आभारे या प्रकरणी जिल्हाधिकारी यांना पाठवलेल्या अहवालाची प्रत देण्यात आली आहे उपविभागीय अधिकाऱ्याने व तहसीलदार माजलगाव यांनी आंदोलनकर्त्यांस अहवाल पत्र देण्यात आले आहे

यासंदर्भात पत्रकारांच्या वतिने पत्रकार राजरत्न डोंगरे,पत्रकार नय्युम आतार, पत्रकार वाजेद पठाण यांनी दि २९ मे २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदन असे नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव उपविभागीय कार्यालया अंतर्गत कार्यरत असलेले माजलगाव सज्जाचे ग्राम महसुल अधिकारी रुपचंद सुधाकर आभारे यांच्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आपल्या पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे.मौजे माजलगाव येथील वादग्रस्त गट नं. १०५ प्लॉट स्वतः च्या पत्नीच्या व नातेवाईकाच्या नावे खरेदी केल्या प्रकरणी तलाठी रुपचंद आभारे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा प्रस्ताव माजलगाव मंडळ अधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे.यामध्ये अकबर दादामियाँ शेख रा.आयशा नगर माजलगाव यांनी तहसील कार्यालयाकडे या संदर्भात तक्रार अर्ज दाखल केलेला होता. त्यामध्ये माजलगाव येथील वादग्रसत गट नं. १०५ मधील क्षेत्राबाबत मा. दिवाणी न्यायालयात स्पे. दि.दा.क्रं.१९/२०२४ हा खटला सुरु असताना तसेच या प्रकरणात सह. दुय्यम निबंधक कार्यालयात विज पेन्डन्स देखील रजिस्टर आहे. म्हणजेच ही जागा पुर्णपणे कायदेशीर वादात अडकली असताना या गटातील मुळ मालक शफिक सत्तार बागवान यांनी अनेक लोकांना प्लॉट विक्री केले होते. या परिस्थीचा गैरफायदा घेत, संबंधित ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) रुपचंद आभारे यांनी स्वतः च्या अधिकाराच्या क्षेत्रात येत असूनही सर्व नियम धाब्यावर बसवुन बेकायदेशीररित्या आपली पत्नी घोषणा रुपचंद आभारे उर्फ घोषणा चिंतामन तिमाडे यांच्या नावावर प्लॉट क्रं. १४ खरेदी केला. परंतु ग्राम महसुल अधिकारी रुपचंद आभारे यांच्यावर मंडळ अधिकारी माजलगाव तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी कार्यालयीन पत्र दिले आहे पत्रकार राजरतन डोंगरे, नाईम आतार व पत्रकार वाजेद पठाण यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर दि १० जुन बुधवार रोजी पासुन बेमुदत धरणे आंदोलनास बसले आसुन हे आंदोलन दि १५ जुन सोमवार रोजी सहाव्या दिवशी अखेर पत्रकारांना न्याय मिळाला या बेमुदत आंदोलनाला यश मिळाले आहे माजलगाव चे सामाजिक जेष्ठ नेते गोरख टाकणखार, सामाजिक जेष्ठ नेते राजाभाऊ भिसे, चंद्रकांत टाकणखार, पत्रकार किसन पवार,पत्रकार शेख अखिल यांनी बेमुदत आंदोलनाला पाठिंबा दिला होता यामुळे बेमुदत आंदोलनाला यश मिळाले आहे.

# इरफान ने दारववून दिले मानवता हाच खरा धर्म-ॲड .पठाण

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील माळशिरस तालुक्यामधील तांदुळवाडी येथे काल पिकप टेम्पो रस्त्याकडेच्या विहिरीमध्ये कोसळून १४ जणांपैकी ८ जणांचा मृत्यू झाला. ज्या सहा जणांना वाचवले आहे त्यामध्ये चार वर्षाचा मुलगा आहे. या घटने जवळून जाणाऱ्या ज्या व्यक्तीने प्रसंगावधान साधत त्यातील चार वर्षाच्या मुलाला व इतर चार जणांना वाचवले आहे त्याचे नाव आहे इरफान. अर्थातच हा मुस्लिम तरुण आहे. त्याने पीडित हे कोणत्या धर्माचे आहेत त्यांचे पार्श्वभूमी काय याची पर्वा न करता विहिरीमध्ये उडी घेत चार वर्षाच्या मुलाला वाचवले. दुसरे असेच उदाहरण हे उत्तराखंड मधील जिम ट्रेनर दीपक कुमार याचे जाने वकील अहमद या दुकान विक्रेत्याला जातीय वादी संघटना च्या लोकांच्या हल्ल्यापासून वाचवले. हे दोघेही तरुण भारतीयत्वाची खरी ओळख आहेत. ते भारताचा वारसा चालवत आहेत त्यांच्याकडे घरी गंगा जमुना तहजीब आहे. त्या दोघांसारखे भारतातील तरुणांनी बनले पाहिजे.

रस्त्याच्या कडेने कठडे नाहीत, विहिरी आहेत, तलाव आहेत त्यांना कठडे नाहीत, खड्डे आहेत या कशाचीही जबाबदारी सरकार घेत नाही. कंत्राटदारांच्या भल्यासाठी नवीन नवीन कर्ज काढून शक्तीपीठ महामार्गासारखे रस्ते तयार करण्यात महायुती सरकार व्यस्त आहे.महाराष्ट्रात व भारतामध्ये सातत्याने मुस्लिम कुटुंबांच्या वर शंकेने व द्वेषाने पाहिले जाते व त्यांच्यावरती अनेक वेळा हल्ले देखील होतात. लव जिहाद अमुक जहा तमुक जिहाद अशी १७ कारणे काढून तरुणांना भडकवून त्यांच्या मशिदीसमोर तलवारी नाचवल्या जातात. या कशाचीही परवा न करता माणुसकी ही सर्वश्रेष्ठ मानत इरफानने विहिरीमध्ये उडी घेत त्या टेम्पो मधील विहिरीत पडलेल्या लोकांना वाचवले. यातून सर्व भारतीयांनी बोध घेण्याची गरज आहे. केवळ राजकारणासाठी आदानी अंबानी यांची तिजोरी भरण्यासाठी लोकांच्या रोज-रोटीच्या प्रश्नांच्या कडे लक्ष जाऊ नये आपली सत्ता राहावी यासाठी जातीयवादी संघटना व त्यांच्या परिवार संघटना जातीयवादी संघटना नी हिंदू मुस्लिम द्वेष वाढवला आहे. हिंदू असतील किंवा मुस्लिम असतील किंवा ख्रिश्चन ,दलित सर्वच धर्मातील सर्वसामान्य लोकांनी समजून घेणे गरजेचे आहे की त्यांच्या धर्मातील मूल तत्त्वादी कट्टर धर्मांध हे आपला धर्म श्रेष्ठ व दुसरा धर्माच्या व्यक्तीमुळे आपला धर्म खतरे मे है असं मांडणी सेट करत असतात याला कोणती भीक न घालता आपण शेवटी एकमेकांना अडचणीच्या वेळी धावून जाणार आहोत यासाठी मानवता हाच श्रेष्ठ धर्म आहे. बाकीचे द्वेषाच राजकारण करतात त्यांना सत्ता हवी आहे पैसा हवा आहे माणुसकी टिकवली तर त्यांच्या राजकारणाला शह देता येईल.

आपल्या सर्वांच्या मध्ये इरफान लपले आहेत, त्यांना जपून ठेवा त्यांना मुक्त करा असे अनेक इरफान तयार होतील हे पहा., भारतातील अनेक ठिकाणी जातीय तेढ निर्माण करण्याचं षडयंत्र चालू आहे , दिल्ली ची घटनेत हॉटेल मधील मुस्लिमांनी अनेक हिंदू बांधवांचे जीव वाचवले पण एक ही जातीयवादी संघटनेचा कार्यकर्ता कडून कसलीही प्रतिक्रिया देण्यात आली नाही , चागल्या कामांना शाब्बासकी मिळायलाच पाहिजे मग ते हिंदू भांडवाकडून होवो नसता मुस्लिम बंधूकडून होवो , पण हे आज काल होताना दिसत नाही भारतातील शांतता रहावी म्हणून हिंदू मुस्लिम दलित शीख त्या त्या समाजातील युवकांनी पुढ येऊन सामाजिक सलोखा घडवून आणला पाहिजे , धार्मिक संघटनेला कुठ तरी कायद्याचा धाक देण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन येणाऱ्या संकटाला मुकाबला करायला आज ची पिढी पुढ का येत नाही याचा बोध घेण्याचं पोलिस प्रशासनाने विचार करायला पाहिजे , मागील अनेक वर्षा पासून पोलिस प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे जर गृह खात्याने ठरवलं तर खूप काही देशात बदल होऊन हिंदू मुस्लिम एकोपा राहील परंतु का कुणास ठाऊक या कामांना प्राधान्य का देण्यात येत नाही , देशातील जातीय वातावरण बघितल तर खूप भयंकर परिस्थिती निर्माण झालेली असताना वातावरणात का बदल होताना दिसत नाही , आज च्या युवकांना शिक्षण शिवाय पर्याय नाही त्यामुळे युवकांनी जातीयवादी किडच्याकडे लक्ष न देता अभ्यासाकडे लक्ष देणे अत्यंत जरूरी आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या निर्देशाने अखेर मिळाला मनासारखा बैल

लातूर / प्रतिनिधी

वीज पडून बैल दगावल्यानंतर संकटात सापडलेल्या लातूर जिल्ह्यातील काशिनाथ गायकवाड यांना अखेर दिलासा मिळाला आहे. प्रशासनाने दिलेला पहिला बैल नांगरणीदरम्यान कोसळल्याने अडचण निर्माण झाली होती. मात्र मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर पशुसंवर्धन विभागाने शेतकऱ्यालाच सोबत घेऊन योग्य बैलाची निवड केली. मनासारखा आणि शेतीकामासाठी सक्षम बैल मिळाल्याने गायकवाड कुटुंबाच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलला आहे.

देवणी तालुक्यातील बोंबली (बु.) येथील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्या संघर्षमय जीवनाला अखेर दिलासा मिळाला आहे. वीज पडून बैल दगावल्याने शेतीकाम ठप्प झाले होते. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, नांगरणीसाठी त्यांच्या पत्नी हौसाबाई गायकवाड यांना स्वतःच्या खांद्यावर जू घेऊन शेतीची कामे करावी लागली. ही घटना समोर आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेत शेतकऱ्याला बैल उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते. मात्र, सुरुवातीला देण्यात आलेला बैल शेतीकामासाठी अनुकूल नसल्याने प्रशासनाने पुन्हा प्रयत्न करून शेतकऱ्याच्या पसंतीचा बैल खरेदी करून दिला. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी काशिनाथ गायकवाड यांना बैल उपलब्ध करून दिला. बैल स्वीकारण्यापूर्वी गायकवाड यांनी त्याची बारकाईने पाहणी केली होती. मात्र, दुसऱ्याच दिवशी शेतीच्या नांगरणीसाठी बैल जुंपल्यानंतर तो अचानक कोसळला. अधिकाऱ्यांच्या मते, बैल नवाट असल्याने आणि वातावरणातील बदलामुळे त्याला कामाची सवय नव्हती. परिणामी तो नांगरणीचे काम करू शकला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर पुन्हा एकदा अडचण निर्माण झाली.




ही बाब समोर आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ शेतकऱ्याला त्याच्या पसंतीचा आणि शेतीकामासाठी सक्षम बैल उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नव्याने बैल शोधण्याची मोहीम सुरू केली. काशिनाथ गायकवाड यांना लातूर येथे बोलावून घेण्यात आले. त्यानंतर पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यासोबत विविध ठिकाणी जाऊन बैलांची पाहणी केली. रेणापूर तालुक्यातील खरोळा येथे चांगले बैल उपलब्ध असल्याची माहिती मिळाल्यानंतर अधिकारी आणि शेतकरी तेथे पोहोचले. दोन ते तीन ठिकाणच्या गोठ्यांमध्ये जाऊन बैलांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली.

प्रत्येक बैलाची ताकद, काम करण्याची क्षमता आणि शेतीसाठीची उपयुक्तता तपासल्यानंतर अखेर गायकवाड यांनी एका बैलाची निवड केली. निवडलेल्या बैलाची खात्री करण्यासाठी केवळ शेतकऱ्यानेच नव्हे तर पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनीही प्रत्यक्ष चाचणी घेतली. बैलाला कुळवाला जुंपून त्याची दोन तास कसून पाहणी करण्यात आली.

बैलाची ताकद, सहनशक्ती आणि कामाची सवय तपासल्यानंतर तो शेतीसाठी योग्य असल्याचे निश्चित करण्यात आले. या प्रक्रियेत पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, सहाय्यक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे, डॉ. राघवेंद्र पडगीलवार आणि डॉ. जितेंद्र वाघमारे यांनी सक्रिय सहभाग घेतला. नवीन बैलाबाबत समाधान व्यक्त करताना काशिनाथ गायकवाड म्हणाले, खरोळा येथे कुळवाला जुंपलेले अनेक बैल पाहिले. त्यापैकी एका बैलाची दोन तास प्रत्यक्ष चाचणी घेतली. बैल मजबूत आणि कामासाठी योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर मी त्याला पसंती दिली. त्यानंतर अक्षरशः कुळव सोडून तो बैल घेऊन आलो. आता हा बैल शेतीच्या कामासाठी योग्य असल्याने माझी मोठी सोय झाली आहे.

वीज पडून बैल दगावल्याने निर्माण झालेल्या संकटामुळे गायकवाड कुटुंब अडचणीत आले होते. पत्नीला नांगरणीसाठी जू ओढावे लागल्याची घटना राज्यभर चर्चेत आली होती. आता पसंतीचा आणि कामासाठी सक्षम बैल मिळाल्याने गायकवाड कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलला आहे. प्रशासनानेही शेतकऱ्याची गरज लक्षात घेऊन केवळ बैल उपलब्ध करून देण्यापुरते न थांबता त्याला प्रत्यक्ष शेतीकामासाठी योग्य बैल मिळावा यासाठी केलेल्या प्रयत्नांचे परिसरात कौतुक होत आहे.

# पोटॅशियम शोनाईट वापरण्याची पद्धत व फायदे



पोटॅशियम शोनाइट हे उत्पादन पोटॅशियम मॅग्नेशिअम या अन्नद्रव्यांच्या डबल सल्फेट सॉल्ट आहे. हे खत पाण्यात १०० % विद्राव्य असल्याने जमिनीमधून ड्रिप मधून किंवा फवारणीतून वापरता येते. यात २३ % पोटॅश १००% मॅग्नेशियम व १५ % गंधक हे अन्नद्रव्य आहेत. कोणत्याही पिकाच्या पक्वतेच्या काळात मॅग्नेशियम व पोटॅश या अन्नद्रव्याची गरज मोठ्या प्रमाणात लागते. कारण पिष्टमय पदार्थ व स्टार्च यांच्या चयापचयाच्या क्रियेत अनुक्रमे मॅग्नेशियम व पोटॅश ही अन्नद्रव्ये भाग घेतात म्हणून त्यांचा पुरवठा अपुरा असल्यास फळांची वाढ आणि क्वालिटी यांच्यावर विपरीत परिणाम दिसून येतो. पक्वता पूर्व स्थितीनुसार शिफारसीनुसार पोटॅशियम शेनाईट चा जमिनीमधून ड्रिप मधून किंवा फवारणी तून वापर केल्यास फळे व भाजीपाला पिकांमध्ये साखर निर्मिती व फळांचे फुगवण यावर अपेक्षित परिणाम दिसून येतात. पोट्याश मुळे फळे व भाजीपाला पिकाची फुगवण तर होतेच पानांचा हिरवा रंग व पर्यायाने त्याची कार्यक्षमता मॅग्नेशियम मुळे अबाधित राहते.

वापरण्याचे प्रमाण :जमिनीतून फळे व भाजीपाला पिकासाठी फळांची सेटिंग झाल्यावर एकरी २५ किलो एकदा द्यावे. ड्रिप मधून फळे व भाजीपाला पिकाच्या तसेच तोडण्याच्या काळात एकरी तीन ते पाच किलो दर आठवड्याला चार वेळा सोडावे.

फवारणीतून ड्रिप ची सोय नसल्यास भाजीपाला पिकाच्या पकवतेपूर्वी तसेच तोडणीच्या काळात फवारणी करावी.

# बुरशीजन्य रोगांची ओळख व उपाय

जेव्हा पीक उगवून येते तेव्हा ते बऱ्याचदा निकृष्ट दर्जाचे उगवलेले दिसते. त्याची मुळे कुजलेले दिसतात. या सर्व समस्या या मातीमधील बुरशीमुळे असू शकतात. त्यामुळे विविध माती व बीजजणित बुरशीरोगांची ओळख व प्रतिबंधक उपायांची माहिती असणे गरजेचे आहे. बऱ्याचदा जेव्हा पीक उगवून येते तेव्हा ते बऱ्याचदा निकृष्ट दर्जाचे उगवलेले दिसते. त्याची मुळे कुजलेले दिसतात. या सर्व समस्या या मातीमधील बुरशीमुळे असू शकतात. त्यामुळे विविध माती व बीजजणित बुरशीरोगांची ओळख व प्रतिबंधक उपायांची माहिती असणे गरजेचे आहे.



असा होतो प्रसार :मातीमध्ये हजारो प्रकारच्या बुरशी,जिवाणू, विषाणू,निमटोड्स असतात. त्या आपली संख्या वाढवण्यासाठी बुरशी पिकाच्या मुळांवर वाढत असतात. जेव्हा त्या मुळातून शिरकाव करतात, त्यावेळी झाडाच्या वरील भागाचा अन्नद्रव्य पुरवठा होण्यास अडथळा निर्माण होतो. झाडाची वाढ खुंटते व झाड वाळते. विल्ट, शेंडा वाढणे, खोडकुज मुळकुज अशी लक्षणे दिसतात. यास अनेक गोष्टी जसे फायटोप्थोरा, पायथियम, रायझोक्टिना कारणीभूत असतात. पिकानुसार बुरशीचा प्रकार बदलतो. या रोगांचे बीजाणू पालापाचोळा, बियात सेच यजमान तणावर सुप्तावस्थेत असतात. हेवी जानू अनेक महिने जमिनीत किंवा जिथे असतील तिथे महिनोन महिने टिकून राहू शकतात. जेव्हा तिथे अनुकूल वातावरण तयार होते तेव्हाच ते आपला प्रभाव दाखवतात.परिणामी पीक कमी होते व उत्पादनात घट येते.

प्रतिबंध व नियंत्रण :द्विदल वर्गातील पिके घेत असाल तर एकदलिय पिकासोबत फेरपालट करावी. एकच पीक एकसारखी घेऊ नये. उन्हाळ्यामध्ये खोल नांगरणी करून जमीन तापू द्यावी. जेणेकरून बुरशीचे बीजाणू तापमानात निष्क्रिय होतील. भर खतामध्ये चांगल्या कुजलेल्या सेंद्रिय खतांचा वापर करावा. त्यामध्ये निंबोळी पेंडीचा देखील समावेश असावा. रोगमुक्त बियाणे तसेच रोग प्रतिकारक्षम वानांना प्राधान्य द्यावे. पेरणी आधी ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाने बीज प्रक्रिया करावी. त्यामुळे मुळात इतर कोणत्याही उपद्रवी बुरशीची वाढ होणार नाही. ट्रायकोडर्मा उपलब्ध नसल्यास थायरम किंवा कॅप्टन अशा रासायनिक बुरशीनाशकांचा आधार घ्यावा. गोमूत्र व जीवामृत हे उत्तम बुरशीनाशक आहेत. त्यांचे आळवणी केल्यास मर/ कूज रोग नियंत्रण चांगल्या पद्धतीने होते. तरीसुद्धा मातीत बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यास कार्बनडेंझिम, कार्बोक्सिन, यासारखे बुरशीनाशके वापरावी. कोणतीही रासायनिक बुरशीनाशके वापरतांना लेबल क्लेम नक्की तपासून घ्यावा.

# बोर्डो पेस्ट बनवण्याची पद्धत आणि वापर

चुना, मोरचूद व पाण्याच्या योग्य प्रमाणातील मिश्रणाला बोर्डो पेस्ट (मलम) असे म्हणतात. हे मिश्रण प्रभावी बुरशीनाशक असून, वेगवेगळ्या तीव्रतेच्या बोर्डो मिश्रणाचा फवारणी व झाडाच्या बुंध्याला लावण्याकरिता वापर केला जातो. वर्षातून कमीत कमी दोन वेळेस बुंध्यांना बोर्डो पेस्ट(मलम) लावावी.

बोर्डो पेस्ट (मलम) तयार करण्याची पद्धत :चुना व मोरचूद यांच्या घट्ट द्रावणास बोर्डो मलम (पेस्ट) असे म्हणतात. बोर्डो पेस्ट तयार करण्यासाठी बोर्डो मिश्रणाप्रमाणेच चांगल्या प्रतीचे मोरचूद आणि उच्च प्रतीचा हवाबंद डब्यातील चुना घ्यावा. बोर्डो पेस्टमध्ये एक किलो मोरचूद, एक कि.ग्रॅ. कळीचा चुना आणि दहा लिटर पाणी वापरतात.

१ किलो स्वच्छ मोरचूद पूड व १ किलो कळीचा चुना प्लॅस्टिकच्या वेगवेगळ्या बादलीत किंवा मडक्यात ५-५ लिटर पाण्यात रात्रभर भिजत घालावे. चुना व मोरचूदचे दुसऱ्या दिवशी अन्य बादलीत मिश्रण करावे. मिश्रण करीत असताना द्रावण काठीने सतत ढवळावे. तयार झालेले घट्ट द्रावण म्हणजेच बोर्डो पेस्ट होय. तयार झालेला बोर्डो मलम झाडांना लावण्यास योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. बोर्डो मलम झाडाच्या बुंध्यास चांगला चिकटून राहावा याकरिता मिश्रणामध्ये स्टीकर किंवा साबुदाण्याचे पाणी मिसळावे. या करिता २५० ग्रॅम साबुदाणा २ लिटर पाण्यात चांगला उकळून गाळून घ्यावा. थंड झाल्यानंतर तयार बोर्डो मिश्रणात मिसळून झाडाच्या बुंध्याला ही पेस्ट लावावी.चांगल्या प्रकारचे पेस्ट तयार झाल्यावर बुंध्यांना लावावे. बुंध्याचे बोर्डो पेस्ट वाळल्यानंतर खोडास निळसर आकाशी रंग येतो.





बोर्डो पेस्ट व बोर्डो मिश्रण तयार केल्यावर ताबडतोब वापरावे. जास्त कालावधी झाल्यास त्याचा परिणाम होत नाही.बोर्डो पेस्ट तयार करताना घ्यावयाची काळजी :बोर्डो पेस्ट फवारणीच्या वेळी फडक्यातून किंवा बारीक चाळणीतून गाळून घ्यावे. तसेच मिश्रण करतेवेळी तिसऱ्या भांड्यात दोन्ही द्रावण ओतताना प्रथम चुन्याचे आणि पाठोपाठ मोरचुदाचे द्रावण ओतून मिश्रण सारखे ढवळावे. एकदा तयार केलेले मिश्रण त्याच दिवशी वापरावे. तयार केलेल्या मिश्रणाची चाचणी निळा लिटमस पेपरने घ्यावी. निळा लिटमस पेपर द्रावणात बुडविल्यानंतर जर लाल झाला तर मिश्रणात अधिक मोरचूद आहे किंवा द्रावण आम्ल आहे असे समजावे. मिश्रणातील जास्त मोरचूद नाहीसे करण्यासाठी मिश्रणात परत चुन्याचे द्रावण निळा लिटमस पेपर निळाच राहीपर्यंत टाकावे. चाचणीची दुसरी पद्धत म्हणजे तयार मिश्रणात लोखंडी खिळा किंवा सळई दहा सें.मी. द्रावणात बुडविले असता त्यावर तांबूस रंग चढला तर (तांबडा दिसणारा थर तांब्याचे सूक्ष्म कण जमून झालेला असतो) द्रावण फवारण्यास योग्य नाही असे समजून थोडी थोडी चुन्याची निवळी ओतावी. ही निवळी ओतण्याची क्रिया लोखंडी खिळा किंवा सळई यावर जमणारा तांबडा थर नाहीसा होईपर्यंत करावी म्हणजे मिश्रण वापरण्यास योग्य होईल.

बोर्डो पेस्टचा वापर : पावसाळा सुरु झाल्यावर बोर्डो मलम पावसाच्या पाण्यामध्ये विरघळून बुंध्याशी गेल्याने मूळाशी असलेल्या रोगकारक बुरशीचा नाश होतो. संत्राबागेमध्ये फायटोप्थोरा (डिंक्या) या रोगाचे बिजाणू जमिनीत असतात. पावसाच्या जोरदार सरींमुळे मातीसोबत त्यातील रोगाचे बिजाणू झाडाच्या बुंध्यावर उडतात. बुरशीच्या वाढीस अनुकूल ओलसर दमट वातावरणात झाडाच्या पेशीत प्रवेश करतात, त्यामुळे डिंक्या रोगाची लागण बागेत होते. फळबागेचे रोगांपासून रक्षण करण्याकरिता प्रतिबंधक उपाय म्हणून वर्षातून कमीतकमी दोन वेळा म्हणजेच उन्हाळा सुरु झाल्यावर आणि पावसाळा संपल्यानंतर फळझाडांच्या बुंध्याला बोर्डो पेस्ट(मलम) लावणे आवश्यक आहे. लिंबूवर्गीय फळपिकावरील पानावरील कोळशी, करपा, फळावरी तपकिरी कुज, खैरया तसेच शेंडेमर करीता ०.६ ते १.० टक्के तीव्रतेचे मिश्रणाचा उपयोग करावा. डिंक्या /पायकूज रोगासाठी बोर्डो पेस्टचा उपयोग करावा (पावसाळया आधी व पावसाळा संपल्यानंतर)पेस्ट झाडाच्या खोडास जमिनीपासून वर १ मीटर उंचीपर्यंत लावावी. झाडांची छाटणी केल्यानंतर फांद्या कापलेल्या ठिकाणी झालेल्या जखमेवर बोर्डो पेस्ट लावल्यास रोगाचे बीजाणू झाडामध्ये प्रवेश करू शकत नाहीत. मूळकुज रोगासाठी झाडाच्या वाफ्यात १ टक्के बोर्डोक्स मिश्रणाची आवळणी करावी. वांगी, मिरची, बटाटा, टोमॅटो, भोपळावर्गीय भाज्या, कोबी, वाटाणा इ. पिकांवरील करपा, काळा करपा, पानांवरील ठिपके, केवडा, भुरी, जिवाणूजन्य करपा अशा विविध रोगांच्या नियंत्रणासाठी वापर करता येतो. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार द्रावणांची तीव्रता ठरवावी. साधारणतः भाजीपाला पिकांसाठी ०.५ ते ०.६% तीव्रतेचे बोर्डो मिश्रण फवारणीसाठी योग्य असते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३२ : मुघल बादशाह शहाजहान याची पत्नी मुमताज हिचे निधन. तिच्या स्मरणार्थ शहाजहान याने आग्रा येथे ताजमहलची निर्मिती केली.
१७९९ : फ्रांस सम्राट नेपोलियन बोनापार्ट यांनी इटली देश आपल्या साम्राज्यात सामावून घेतला.
१८८५ : न्यू यॉर्क बंदरमध्ये स्टॅच्यू ऑफ लिबर्टी चे आगमन झाले.
१९१७ : महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी हे साबरमती आश्रमातील हृदय कुंज या टिकाणी रहायला गेले.
१९२९ : सोवियत संघाने चीन बरोबर असणारे आपले राजनैतिक संबंध संपुष्टात आणले.
१९३३ : सविनय कायदेभंग चळवळ मागे घेण्यात आली
१९४० : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी फ्रान्समधुन माघार घेण्यास सुरूवात केली.
१९४४ : आइसलँडने (डेन्मार्कपासुन) स्वातंत्र्य घोषित केले आणि ते प्रजासत्ताक बनले.
१९४४ : जर्मनीने दुसऱ्या महायुद्धात हार मानली
१९६३ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक शाळांतून बायबलचे पठण करणे कायदेबाह्य ठरवले.
१९६७ : चीनने पहिल्या हायड्रोजन बॉम्बचा स्फोट केला.
१९७० : शिकागोत पहिल्यांदाच किडनी ट्रान्सप्लॅन्टची शस्त्रक्रिया करण्यात आली
१९७२ : वॉटरगेट कुभांड डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्यालय फोडून कागदपत्रे पळवल्याबद्दल रिचर्ड निक्सनच्या चार साथीदारांना अटक.
१९९१ : भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि पंतप्रधान राजीव गांधी यांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
२००४ : मंगळावर पृथ्वीप्रमाणेच दगड सापडले.
२००८ : 'तेजस' विमानाची पहिल्यांदाच यशस्वी चाचणी करण्यात आली.
२०१२ : भारतीय बॅडमिंटनपटू सायना नेहवाल यांनी इंडोनेशिया ओपन स्पर्धा तिसऱ्यांदा जिंकली.
२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात ढगफुटी होऊन एका दिवसात १३ इंच पाऊस पडला. शेकडो व्यक्ती मृत्युमुखी, हजारो यात्रेकरी अडकले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२३९ : एडवर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ७ जुलै १३०७)
१७०४ : फ्लाइंग शटल चे शोधक जॉन के यांचा जन्म.
१८६७ : लघुलेखन पद्धतीचा शोधक जॉनरॉबर्ट ग्रेग यांचा जन्म.
१८८७ : प्रख्यात भारतीय राजकारणी, मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री आणि केंद्रीय संरक्षणमंत्री तसचं, पश्चिम बंगाल व ओरिसा राज्याचे माजी राज्यपाल कैलाशनाथ काटजू यांचा जन्मदिन.
१८९८ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ कार्ल हेर्मान यांचा जन्म.
१९०३ : बाबूराव विजापुरे संगीतशिक्षक? (मृत्यू: ७ डिसेंबर १९८२)
१९०३ : चॉकोलेट चिप कुकी चे निर्माते रुथ ग्रेव्हस वेकफिल्ड यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९७७)
१९२० : नोबेल पारितोषिक विजेता फ्रेंच जीवशास्त्रज्ञ फ्रांस्वा जेकब यांचा जन्म.
१९७३ : लिअँडर पेस भारतीय टेनिसपटू
१९८० : महान अमेरिकन व्यावसायिक टेनिसपटू वीनस विलियम्स यांचा जन्मदिन.
१९८१ : शेन वॉटसन ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९७ : ज्येष्ठ गुरु संत श्री निवृत्तीनाथ महाराज यांनी त्र्यंबकेश्वर येथे देह ठेवला. (जन्म: २९ जानेवारी १२७४)
१६३१ : शाहजहानची पत्नी मुमताज महल यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १५९३)
१६७४ : राजमाता जिजाबाई (छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री) (जन्म: १२ जानेवारी १५९८)
१८५८ : झाशीच्या राणी लक्ष्मीबाई इंग्रजांच्या विरूद्ध चकमकीत धारातीर्थी.
१८३९ : ब्रिटीश कालीन भारताचे १४ वे गव्हर्नर जनरल(राज्यपाल) लॉर्ड विलियम बेटिंक यांचे निधन.
१८६५ : ब्रिटीश कालीन भारतातील ब्रिटीश गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यांचे निधन.
१८९३ : भारताचे १४ वे राज्यपाल जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंक यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर १७७४)
१८९५ : गोपाळ गणेश आगरकर लोकमान्य टिळकांचे सहकारी व 'केसरी'चे पहिले संपादक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे एक संस्थापक व फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य, समाजसुधारक, विचारवंत व शिक्षणतज्ञ, 'सुधारक' या वृत्तपत्राचे संस्थापक व संपादक (जन्म: १४ जुलै १८५६)
१९२८ : पण्डित गोपबंधूदास तथा 'उत्कलमणी' ओरिसातील समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, स्वातंत्र्यसेनानी, कवी व लेखक (जन्म: ९ आक्टोबर १८७७)
१९६५ : मोतीलाल राजवंश ऊर्फ 'मोतीलाल' आपल्या ऐटबाज व्यक्तिमत्त्वाने व सहजसुंदर अभिनयाने रसिकांवर मोहिनी घालणारे अभिनेते (जन्म: ४ डिसेंबर १९१०)
१९८३ : शरद पिळगावकर चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व वितरक (जन्म: )
१९९६ : मधुकर दत्तात्रय तथा 'बाळासाहेब' देवरस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक (जन्म: ११ डिसेंबर १९१५)
२००४ : इंदुमती पारीख, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.१७ जून २०२६


# रविकांत तुपकरांच्या अन्नत्यागाला केजमधून पाठिंबा

## तहसीलसमोर टायर जाळून सरकारचा निषेध, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे चक्काजाम आंदोलन

केज । प्रतिनिधी

क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत भाऊ तुपकर हे सरसकट कर्जमाफी व पीकविमा नुकसान भरपाईसाठी दि. १५ जूनपासून बुलढाणा येथे ''बेमुदत अन्नत्याग'' आंदोलनाला बसले आहेत. या आंदोलनाच्या समर्थनार्थ आज केज येथे शेतकऱ्यांनी सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी आज दि.१६ जून मंगळवारी सकाळी ११:३० वाजता तहसील कार्यालय, केज येथे धडक देऊन प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी तथा तहसीलदार श्री. शुभम पवार यांना १० प्रमुख मागण्यांचे निवेदन सादर केले.





निवेदनानंतर तहसील कार्यालयासमोर टायर जाळून निषेध निवेदन दिल्यानंतर संतप्त शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाच्या समोरच टायरमध्ये फसव्या जीआरची प्रत'' जाळून सरकारचा तीव्र निषेध नोंदवला. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आज टायर जाळले, उद्या खुर्ची जळेल'' - कुलदीप करपे यांचा गंभीर इशारा यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे म्हणाले, ''आज आम्ही तहसीलसमोर टायर जाळले. सरकारने वेळीच दखल नाही घेतली तर उद्या सरकारची खुर्ची जळायला मागेपुढे शेतकरी बघणार नाहीत. रविकांत भाऊ उपाशी आहेत आणि सरकार जीआरच्या नावाखाली फसवणूक करतंय. हे शेतकरी सहन करणार नाही. उद्या होळ येथे चक्काजाम उद्या दि. १७ जून २०२६, बुधवार सकाळी १० वाजता बीड-अंबाजोगाई-लातूर महामार्गावर होळ, ता. केज येथे ''चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. निवेदनातील १० प्रमुख मागण्या: सरसकट विनाअट, विनाशर्थ कर्जमुक्ती करावी. खरीप २०२५ चा हेक्टरी ₹१७,५००/- पीकविमा नुकसान भरपाई द्यावी.मे २०२६ च्या वादळात केळीचे १००% नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी. उमरी (केज) टोल नाक्यावर स्थानिक वाहनांना टोल माफी द्यावी., तालुक्यातील प्रलंबित पांदण, शेत-रस्ते, बांध रस्ते तात्काळ खुले करावेत. खत, बियाणे यांचा काळाबाजार थांबवून शासकीय दराप्रमाणे लिंकिंग न करता उपलब्ध करावे. शेतकऱ्यांना दिवसा सिंचनासाठी अखंड ८ तास उच्च दाबाने विना खंड वीजपुरवठा करावा. महाडीबीटी द्वारे ऑनलाईन पात्र झालेल्या शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, ठिबक, तुषार सिंचनासाठी पूर्वसंमती तात्काळ द्यावी. गाय गोठा, विहिरी, घरकुल योजनेत पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान वाटप करावे.२०२५-२०२६ मधील ऊस गाळप हंगामातील निर्धारित  नुसार थकीत ऊस बिल तात्काळ वाटप करावे. यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे ,केज तालुकाध्यक्ष दिलीप लोंढे ,युवा तालुकाध्यक्ष अतुल गवळी ,सतिश भाऊ शिंदे,हरिभाऊ आघाव ,दिंगबर तपसे ,सुनील कापरे, भारत धपाटे ,सुग्रीव करपे ,उमेश गायकवाड, दत्तात्रय चाळक,दादासाहेब गुंड, शहाबुद्दीन शेख ,इमरान कुरेशी ,अण्णा पौळ अजय कांबळे ,मुखीद शेख ,अमोल चौधरी ,भारत जाधव आदी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# राजासारखे जीवन जगायचे असेल तर शिक्षणच एकमेव पर्याय:ॲड. अरुण जाधव

### जि.प.शाळा तपनेश्वर येथे इयत्ता पहिलीचा प्रवेशोत्सव उत्साहात



जामखेड । प्रतिनिधी

समाजात सन्मानाने, स्वाभिमानाने आणि राजासारखे जीवन जगायचे असेल, तर त्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा अधिकार हा वंचित, उपेक्षित आणि भटक्या-विमुक्त समाजासाठी परिवर्तनाचा मार्ग ठरला आहे. त्यामुळे सर्वच महापुरुषांनी शिक्षणाला सर्वोच्च स्थान दिले आहे. असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणात भटके विमुक्त नेते तथा नगरसेवक ॲड.डॉ.अरुण जाधव यांनी केले.शहरातील तपनेश्वर परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,येथे दि. १५ जून रोजी आयोजित इयत्ता पहिलीच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना ॲड.डॉ.जाधव बोलताना म्हणाले,आज या शाळेत राबविण्यात आलेला प्रवेशोत्सव आणि कुंकवाच्या ताटात पाय बुडवून विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे जतन करण्याचा उपक्रम हा खरोखरच कौतुकास्पद आहे. बालकाच्या शालेय जीवनातील पहिला दिवस आणि शिक्षणाच्या प्रवासातील पहिले पाऊल कायम स्मरणात राहावे, यासाठी शिक्षकांनी केलेला हा अनोखा प्रयत्न अभिनंदनीय आहे. जिल्हा परिषद शाळेच्या उंबरठ्यावरून बालकाच्या शिक्षण प्रवासाची सुरुवात होते. आज या चिमुकल्यांनी शिक्षणाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. हीच मुले उद्याचा समाज घडवतील, याचा विश्वास वाटतो. प्रवेशोत्सवानिमित्त इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील पहिल्या दिवसाची आठवण जपण्यासाठी कुंकवाच्या ताटात पाय बुडवून कागदावर पायाचे ठसे घेण्याचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, गणवेश तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी आम आदमी पार्टीचे संतोष नवलाखा, नगरसेविका संगीता भालेराव, नगरसेविका नंदा होळकर, माजी नगरसेविका राजश्री पवार, ॲड. शकील शेख, प्रा. संतोष चव्हाण, महेंद्र आदे, मच्छिंद्र जाधव, मेघराज पवार यांच्यासह मुख्याध्यापक मच्छिंद्र खैरे, प्रताप पवार, जयश्री पाटील, मंगल सोलंकर, शितल कदम, रूपाली कांबळे, कल्पना मोरे, स्वाती गोरे आदी पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मच्छिंद्र खैरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रताप पवार यांनी तर आभारप्रदर्शन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज पवार यांनी मानले.

# पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया मोहिम यशस्वी करा -जिल्हाधिकारी मित्तल

### २ लाख ५३ हजार बालकांना देण्यात येणार पोलिओची मात्रा

जालना। प्रतिनिधी

जिल्हास्तरीय पल्स पोलिओ मोहिमेची सभा जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनामध्ये संपन्न झाली. पल्स पोलिओ मोहिमेसाठी सुक्ष्मकृती आराखडयाचे  काटेकोरपणे पालन करुन एकही ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पल्स पोलिओ मधुन वंचित राहणार नाही असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. पल्स पोलिओ मोहिम अंतर्गत जालना जिल्हयातील ० ते ५ वयोगटातील २ लक्ष ५३ हजार बालकांना पोलिओची मात्रा रविवार, २८ जुन रोजी देण्यात येणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी सांगितले.



स्टॉप डायरिया मोहिम अंतर्गत ५ वर्षाखालील बालकांना ओ.आर.एस. व झिंक टॅबलेट घरोघरी जाऊन देण्यात येणार आहे. यामध्ये ओ.आर.टी.कॉर्नर स्थापन करण्याचे निर्देश मा.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया, एच.पी.व्ही.लसीकरण, गोवर व रुबेला दुरीकरण मोहिम विषयी माहिती दिली. एच.पी.व्ही.लसीकरण वाढविणे त्यासाठी शाळांना भेटी देणे.  ई-संजीवनी ओ.पी.डी. वाढविणे.  महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा लाभ ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी द्यावा.  रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देऊन रेफर करणे शक्यतो टाळावे. आपल्या आरोग्य संस्था नियमित स्वच्छ असाव्यात.  तालुका आरोग्य अधिकारी यांनी आपल्या पी.एच.सी.ला नियमित भेटी देऊन सर्व आरोग्य उपक्रमांचा आढावा घेऊन स्वच्छता पाहणी करण्याचे निर्देश दिले. यावेळी डॉ.जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकीत्सक, डॉ.तरुणा छाबडा अध्यक्ष इंडियन असोसिएशन ऑफ पीड्रीयाट्रिक, संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ.बळीराम बागल अध्यक्ष आयएमए, डॉ.शुंभागी मिसाळ प्रपाठक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय डॉ.श्रीकांत देसाई माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.एन.जी.पवार साथरोग अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ना.ग.बाबूजी आव्हाड महाविद्यालयाच्या ९४ विद्यार्थ्यांची शासकीय सेवेत निवड

पाथर्डी । प्रतिनिधी

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातही विद्यार्थी शासकीय सेवेत भरती करण्याची सुवर्ण परंपरा कायम राखली असून या वर्षी तब्बल ९४ विद्यार्थ्यांची पोलीस आर्मी तसेच इतर शासकीय सेवेत निवड झाली ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना दर्जेदार उच्चशिक्षण मिळून त्यांनाही नोकरीच्या संधी मिळाव्यात ही दुरदृष्टी ठेऊन थोर स्वातंत्र्यसेनानी माजी आमदार स्व.बाबुजी आव्हाड यांनी या शैक्षणिक संकुलाची महाविद्यालयाची स्थापना केली आज बाबूजी आव्हाड महाविद्यालय ग्रामीण भागातील उसतोडणी कामगारांच्या मुलांना उच्च शिक्षणाबरोबरच त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणारे गावपातळीवरील विद्यापीठ ठरत आहे.

गत १५ वर्षात महाविद्यालयाच्या ग्रंथालय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र करिअर कट्टा तसेच भव्य अशा क्रीडांगणाचा व पुरविण्यात आलेल्या मोफत क्रीडा सोईसुविधांचा वापर करून ५००० पेक्षा जास्त विद्यार्थी पोलीस दल आर्मी एमपीएससी तसेच इतर शासकीय सेवेत भरती झाले आहेत दिवसभर अभ्यासिकेत अभ्यास तसेच महाविद्यालयाने वैयक्तिक मार्गदर्शनाबरोबरच पुरविलेल्या प्रश्नसंचांचा सराव करून व नंतर क्रिडांगणावर शारीरिक चाचणीची तयारी करून विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे यावर्षी पोलीस व खात्यांतर्गत पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत ५६ भारतीय सैन्यदलात ३१ विविध शासकीय अस्थापनात ०५ तर सेट-नेट परीक्षेत ०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

बाबूजी आव्हाड महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्यास तसेच विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यास प्रोत्साहित केले जाते. महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच विद्यार्थी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विविध शासकीय सेवेत भरती व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन महाविद्यालयात विद्यार्थी घडविण्याचे काम केले जाते.

**-अभय आव्हाड,** अध्यक्ष पार्थ विद्या प्रसारक मंडळ पाथर्डी

# मंठा पोलिसांची अवैध देशी दारू वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध कारवाई

मंठा। प्रतिनिधी

मंठा पोलीस ठाणे हद्दीत अवैधरित्या देशी दारूची वाहतूक व विक्री करण्याच्या उद्देशाने नेण्यात येत असलेल्या देशी दारूवर पोलिसांनी स्वतंत्र कारवाया करून दोन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.  दिनांक १५ जून रोजी सायंकाळी सुमारे ७ : २५ वाजेच्या सुमारास गेवराई पाटी येथे पोलिसांनी कारवाई केली. यावेळी आरोपी ईरसान आगाखाँ पठाण (वय ४४ वर्षे, रा. पाटोदा ता. मंठा, जि. जालना) याच्या ताब्यातून देशी दारू भिंगरी संत्रा कंपनीच्या १८० एम.एल. क्षमतेच्या ९६ सिलबंद बाटल्या (किंमत ₹९,६००) व वाहतुकीस वापरण्यात आलेली हिरो एच.एफ. डिलक्स मोटारसायकल क्र. २१/६५८४ (किंमत ₹ ६०,०००) असा एकूण ₹ ६९,६०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गु.र.नं. ३१८/२०२६ कलम ६५(अ),(आ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याच दिवशी रात्री सुमारे ७ : ४५ वाजता विडोळी फाटा, मंठा येथे पोलिसांनी कारवाई करून आरोपीच्या ताब्यातून देशी दारू भिंगरी संत्रा कंपनीच्या १८० एम.एल. क्षमतेच्या ४८ सिलबंद बाटल्या (किंमत ₹४,८००) व वाहतुकीस वापरण्यात आलेली हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटारसायकल क्र. २२/५०५५ (किंमत ₹ ५५,०००) असा एकूण ₹ ५९,८०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गु.र.नं. ३१७/२०२६ कलम ६५(अ),(आ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कारवायांमध्ये एकूण १४४ देशी दारूच्या बाटल्या व दोन मोटारसायकलींसह ₹१,२९,४०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून पुढील तपास पोलीस अधिकारी करीत आहेत.

# किर्तनवाडी दरोडा प्रकरणी एक आरोपी जेरबंद न्यायालयाकडून पाच दिवसांची पोलीस कोठडी

पाथर्डी प्रतिनिधी

तालुक्यातील खरवंडी कासार परिसरातील किर्तनवाडी येथे झालेल्या गाजलेल्या सशस्त्र दरोडा प्रकरणातील एका संशयित आरोपीला अटक करण्यात पाथर्डी पोलिसांना यश आले आहे या कारवाईमुळे दरोड्याच्या तपासाला वेग आला असून उर्वरित आरोपींच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली पोलीस हवालदार दत्ता गव्हाणे ज्ञानेश्वर इलग सागर बुधवंत इजाज सय्यद ज्ञानेश्वर शिंदे संदीप नागरगोजे यांनी तपासाची सूत्रे वेगाने फिरवत आरोपीचा माग काढला संशयित आरोपी राहुल रज्जाक काळे (वय २७ रा.टाकळी मानूर ता.पाथर्डी सध्या रा.चकलांबा ता.शिरूर कासार जि.बीड) याला शनिवारी चकलांबा येथून ताब्यात घेण्यात आले त्याला पाथर्डी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली खरवंडी कासार परिसरातील किर्तनवाडी येथे १० जून रोजी पहाटे सात ते आठ जणांच्या सशस्त्र टोळीने दोन घरांवर दरोडा टाकून साडेचार लाखांहून अधिक किमतीचा ऐवज लुटला होता गोपनीय पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार या दरोड्यात सात ते आठ आरोपींचा सहभाग असल्याचा संशय असून उर्वरित आरोपींच्या अटकेसाठी शोधमोहीम सुरू आहे एका आरोपीच्या अटकेमुळे दरोडा प्रकरणाच्या उकल दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले असून पुढील तपासातून आणखी आरोपी पोलिसांच्या जाळ्यात फडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### खोक्या भोसले आणि बीड पाथर्डी दरोड्यांचे कनेक्शन ?

कुख्यात गुंड खोक्या भोसले आणि खरवंडी परिसरात झालेल्या दरोड्यांचे खास कनेक्शन असल्याचा संशय बळावला असून शिरूर कासार येथील जुगार किंग हरणांची शिकार करणारा आणि पाथर्डी व बीड जिल्ह्यात सशस्त्र दरोडे टाकणाऱ्या टोळीचा मुख्य म्हणून सतीश उर्फ खोक्या भोसले याच्यावर संशय बळावर चालला असून पारधी समाजातील अट्टल गुन्हेगार व दरोडेखोरांना आश्रय देणे त्यांच्याकडून चोऱ्या करून घेणे त्याच्यातून कमिशन रुपी करोडो रुपये कमावणे असे उद्योगधंदे या खोक्या भोसलेचे असून याच्यावर एम पी डी ए ॲक्ट अनुसार गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे विशेष म्हणजे काही महिन्यांपूर्वी खोक्या भोसले हा बीड जिल्हा कारागृहात कैद होता आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांचा खोक्या भोसले हा खास बटन असल्याचे बोलले जाते.

पाथर्डी पोलिसांनी एका दरोडेखोराला अटक केले असून ही दरोडेखोरांची टोळी तब्बल आठ ते दहा जणांची असून गेल्या तीन ते चार वर्षांपासून विविध ठिकाणी दरोडे टाकण्याच्या गुन्ह्यांत सक्रिय असल्याची माहिती समोर येत आहे या टोळीचा माग काढण्यात पोलिसांना यापूर्वी यश आले नव्हते मात्र अलीकडील कारवाईमुळे या टोळीच्या अनेक गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप

### जिल्हाधिकाऱ्यांकडून मुला मुलींना शुभेच्छा



जालना। प्रतिनिधी

नव्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पहिल्या दिवशी, सोमवार १५ जून रोजी जिल्ह्यातील विविध शाळा मध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात पार पडला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी 'पीएम श्री' जिल्हा परिषद प्रशाला, सेलगाव' (ता. बदनापूर) येथे भेट देवून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी श्रीमती मित्तल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, त्यांना नव्या शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी शाळा परिसराची पाहणी करत, स्वच्छता व शैक्षणिक वातावरण राखण्याचे देखील निर्देश शाळा प्रशासनाला दिले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

बुधवार दि.१७ जून २०२६ | ६

## अनुसूचित जातीतील अ, ब, क, ड आरक्षण उपवर्गीकरण करा

# बीडमध्ये मातंग क्रांती मोर्चाचा आरक्षण उपवर्गीकरणासाठी मोर्चा

**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय संविधानाने अनुसूचित जातींना सामाजिक न्याय व समान संधी मिळाव्यात यासाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. मात्र, अनुसूचित जातीतील मातंग समाज आजही शिक्षण, नोकरी, उद्योग, व्यवसाय, राजकीय प्रतिनिधित्व व आर्थिक विकासाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मागे राहिलेला आहे. त्यामुळे मातंग समाजाला न्याय मिळण्यासाठी अनुसूचित जातीतील अ, ब, क, ड आरक्षण उपवर्गीकरण तात्काळ लागू करणे ही काळाची गरज बनली आहे यासह इतर मागण्यांसाठी बीड शहरामध्ये मातंग क्रांती मोर्चा च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयवर मंगळवारी दुपारी मोर्चा काढण्यात आला.**

बीड शहरामध्ये मंगळवारी दुपारी सिद्धिविनायक व्यापारी संकुल स्टेडियम येथून मातंग क्रांती मोर्चा प्रारंभ झाला शहरातील प्रमुख मार्गावरून हा मोर्चा सुभाष रोड, अण्णाभाऊ



साठे चौक पुतळा, जालना रोड, बस स्थानक रोड परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक पुतळा, नगर रोड मार्गे जिल्हाधिकारी कार्यालवर धडकला. यानंतर जिल्हाधिकारी कार्यासमोर मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. हा मोर्चा क्रांती मोर्चा चे समन्वयक विनोद हातागळे, अनिल चांदणे, गणपत भिसे, विष्णू कसबे, सुदाम धुपे, आदिनाथ सोनवणे, हिरामण गालफाडे, राजेश घोडे, भास्कर शिंदे यांच्यासह शेकडो महिला पुरुष यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला. मातंग समाजाच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या लहूजी साळवे अभ्यास आयोगाच्या सर्व शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच मातंग समाज व समाजातील महापुरुषांविषयी फेसबुक व इतर सोशल मीडियावर आक्षेपार्ह, बदनामीकारक व समाजाच्या भावना दुखावणाऱ्या पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. मातंग समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना, स्वतंत्र वस्तीगृह सुविधा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे तसेच उच्च शिक्षणासाठी विशेष आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे. समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाचा स्वतंत्र अभ्यास करून विकासातील अनुशेष भरून काढण्यासाठी विशेष ▶▶ पान २ वर

### मातंग समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मोर्चात महिला, युवक, पुरुषांचा मोठा सहभाग

### संयोजकांनी मानले आभार

**आरक्षण उपवर्गीकरण मोर्चाला मातंग समाजाने मोठा प्रतिसाद दिल्याबद्दल मोर्चाचे संयोजक विनोद हतांगळे, अनिल चांदने, गणपत भिषे, विष्णु कसबे, सुदाम धुपे, अदिनाथ सोनवणे, हिरामण गालफाडे, राजेश घोडे, भासकर शिंदे, अशोक थोरात, गोरख मोमीन, प्रभाकर चांदणे आदिनी समाजाचे आभार मानले.**

### साठेंना भारतरत्न द्या

**लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा तसेच अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ यांना किमान १००० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा. याचबरोबर अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ सातत्याने संघर्ष करणारे नेते सहभागी झाले होते.**

---

# फसव्या कर्जमाफी विरोधात शिरूर मध्ये शेतकऱ्यांचा जनआक्रोश

### जाचक अटी व शर्ती रद्द करा-जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीतील जाचक अटी व शर्ती विरोधात मा. विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादास दानवे यांच्या आदेशावर, जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने शिरूर तहसील कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली. सदरील रॅलीस मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले की निवडणुकी पूर्वी शेतकऱ्यांना सात बारा कोरा




करू असे आश्वासन दिले होते सत्तेत आल्यानंतर सदरील आश्वासनास हरताळ फासून जाचक अटी व शर्ती लावून शेतकऱ्यांना कर्जमाफी पासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र रचले आहे

महायुती सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक आहे. ही कर्जमाफी नव्हे तर शेतकऱ्या कडून कर्ज वसुली आहे.२०१९ मध्ये कर्जमाफी चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ पन्नास हजार रुपयांची मदत मिळणार आहे ही मदत पण शेतकऱ्यांकडे असलेली पूर्वीची थकबाकी भरली तरच मिळणार आहे. राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांची थकबाकी ही लाख दीड लाख रुपये असून त्यांना कर्जमाफी चा लाभ घ्यायचा असेल तर पन्नास हजार रुपये साठी एक लाख रुपये भरावे लागतील अशा रझाकारी अटी व शर्ती लावण्यात आल्या आहेत असा सरकारचा आदेश म्हणजे बुडणाऱ्या शेतकऱ्यांच्या ▶▶ पान २ वर

# बीड मधील बळीराजा गर्जना ट्रॅक्टर

### ● रॅलीने सरकारला घाम फोडला-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

फडणवीस सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांसाठी दिलासा नसून फसवणुक आहे. यामधील नियम,अटी,शर्ती या जाचक आहेत. भाजपा हा जुमलेबाज पक्ष आहे व फडणवीस सरकारची कर्जमाफी फसवी असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने, आ.अंबादासदादा दानवे यांच्या मार्गदर्शनाने व जिल्हाप्रमुख




गणेश वरेकर यांच्या नेतृत्वात व बीड तालुकाप्रमुख गोरखआण्णा शिंगण, उपजिल्हाप्रमुख हनुमान गुजर, जिल्हा संघटक रतन गुजर, धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ, माजी तालुका प्रमुख मदन परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयवर भव्य ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली.

यावेळी बोलताना गणेश वरेकर म्हणाले की फडणवीस सरकार हे घोषणांचा पाऊस पाडुन जनतेला फक्त गाजर दाखवते. आताही शेतकरी कर्जमाफीच्या घोषणेत विवीध नियम, अटी, ▶▶ पान २ वर

---

# श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे आ.सुरेश धस यांनी घेतले बडे बाबांच्या समाधीचे दर्शन; विकासकामांची केली पाहणी



**आष्टी । प्रतिनिधी**

सोमवती अमावस्येच्या पावन पर्वाचे औचित्य साधत आमदार सुरेश धस यांनी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे भेट देऊन बडे बाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री मच्छिंद्रनाथ महाराजांच्या समाधीचे भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी त्यांनी समाधीस्थळी नतमस्तक होत राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. सोमवती अमावस्या हा धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. या पार्श्वभूमीवर आ. सुरेश धस यांनी गडावरील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा केली. भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामांचा त्यांनी आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या. गड परिसरातील पायाभूत सुविधा, ▶▶ पान २ वर

# नगरसेवकाची शेतकऱ्यास शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी

### धारूर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल

**धारूर । प्रतिनिधी**

**तालुक्यातील आरणवाडी गावात जाऊन धारूर येथील नगरपालीकेच्या नगरसेविकेचे पती सुरेश रंगनाथ लोकरे यांनी एका शेतकऱ्यास शिवीगाळ करीत बघून घेण्याची धमकी दिली. या प्रकरणात शेतकऱ्याच्या तक्रारीवरून धारूर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा सोमवारी रात्री नोंदविण्यात आला आहे.**

आरणवाडी गावातील रहिवाशी मकरध्वज दगडू जगताप यांनी दिलेल्या तक्रारीनुसार गावातील हनुमान मंदिराच्या पाठीमागील शेतातून सोमवारी सायंकाळी ६ वाजता जात असताना सुरेश रंगनाथ लोकरे (रा.धारूर) यांनी माझ्या नावावर असलेली जमीन विकण्यासाठी का रोखता असे विचारले. त्यावर तक्रारदाराने सांगितले की, आपला न्यायालयात वाद सुरू आहे. तो निकाली निघाल्यानंतर पाहू असे सांगितले. तेव्हा सुरेश लोकरे यांनी काहीएक न ऐकता शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी तू धारूर मध्ये ये तुला दाखवतो. जमीन विकू दिली नाहीस तर जीवे मारून टाकतो अशी म्हणत धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

# महायुतीतील अंतर्गत वाद शहराच्या विकासाला अडथळा ?

### आपसातील आरोप-प्रत्यारोपांमुळे विकासाचे प्रश्न पडले बाजूला

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

**माजलगाव मतदारसंघात गेल्या काही दिवसांपासून महायुतीतील प्रमुख घटक पक्षांच्या नेत्यांमध्ये सुरू असलेला आरोप-प्रत्यारोपांचा संघर्ष आता उघडपणे समोर येत असून, त्याचा परिणाम मतदारसंघातील विकासकामांवर होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रकाश सोळंके यांनी पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांच्यावर आपल्या विरोधात काम केल्याचा आरोप केला होता. त्यानंतर भाजपचे नेते माधव निर्मळ यांनी आमदार सोळंके यांच्यावर टीका करत त्यांना आमदारकीचा राजीनामा देऊन पुन्हा जनतेसमोर जाण्याचे आव्हान दिले. तसेच त्यांच्या कार्यपद्धतीवरही कठोर शब्दांत टीका केली.या आरोपांना प्रत्युत्तर देताना धारूरचे नगराध्यक्ष बालाभाऊ जाधव यांनी माधव निर्मळ यांच्यावरही तीव्र शब्दांत टीका केली. त्यामुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद अधिकच चव्हाट्यावर आले आहेत.दरम्यान, मतदारसंघात शहरातील पाणीपुरवठा योजनेमुळे उकरून ठेवलेले रस्ते, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, दुष्काळी परिस्थिती, तसेच इतर मूलभूत सुविधांचे प्रश्न कायम आहेत. या प्रश्नांवर लक्ष केंद्रित होण्याऐवजी नेत्यांमधील वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप अधिक चर्चेत असल्याने विकासकामांकडे दुर्लक्ष होत ▶▶ पान २ वर

---

# श्रावणापूर्वी परळीतील ८४ खोल्यांचे भक्तनिवास होणार सुरू

### आ.धनंजय मुंडे यांचे स्पष्ट निर्देश

**परळी वै.। प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी वैजनाथ येथे दर्शनासाठी येणाऱ्या लाखो शिवभक्तांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेले ८४ खोल्यांचे सुसज्ज भक्तनिवास आगामी श्रावण महिन्यापूर्वी सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या निर्देशानंतर संबंधित यंत्रणांनी भक्तनिवासाच्या उर्वरित कामांचा आढावा घेत नियोजन निश्चित केले आहे.

परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत माजी मंत्री धनंजय मुंडे व ना. पंकजा मुंडे यांच्या प्रयत्नातून निधी प्राप्त झाला होता. या निधीतून विविध



विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. मात्र, विविध कारणांमुळे पोलीस स्टेशनजवळ उभारण्यात आलेले ▶▶ पान २ वर

# अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेणे कायदेशीर गुन्हा, ७ वर्षांच्या शिक्षेची तरतूद

### उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांचा तरुणाईला इशारा



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

प्रेम भावनांचा आदर करा, परंतु कायद्याची चौकट ओलांडून अल्पवयीन मुला-मुलींना फूस लावून पळवून नेणे किंवा त्यांच्यासोबत पळून जाणे हा गंभीर कायदेशीर गुन्हा आहे, असा स्पष्ट इशारा बीडच्या अंबाजोगाई येथील उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांनी दिला आहे. जिल्ह्यातील तरुण पिढीला कायद्याची जाणीव करून देण्यासाठी बीड जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने अंबाजोगाई उपविभागात एक विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. 'प्रेम असू दे... पण निर्णय समजदारपणाचा असूदे' असा महत्त्वपूर्ण संदेश देत पोलिसांनी प्रामुख्याने तरुणाईला सतर्क केले आहे.देशात लागू झालेल्या नव्या कायद्यानुसार, म्हणजेच भारतीय न्याय संहिता (बी एन एस) च्या कलम १३७(२) ▶▶ पान २ वर

---

# ऊसतोड मजूर पुरवठ्याच्या नावाखाली १३.४८ लाखांची फसवणूक; कल्याण मुंडे विरुद्ध गुन्हा

**केज । प्रतिनिधी**

**ऊसतोड मजूर पुरवठा करण्याच्या बहाण्याने ट्रॅक्टर मालकाची तब्बल १३ लाख ४८ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कल्याण बापूराव मुंडे (रा.ताडसोन्ना, ता.बीड) याच्या विरोधात युसूफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

होळ (ता.केज) येथील भीमराव उत्तमराव घुगे हे ट्रॅक्टर वाहतूक व्यवसाय करतात. सन २०२४-२०२५ च्या ऊसतोड हंगामासाठी त्यांनी कर्नाटकातील बालाजी शुगर फॅक्टरी येथे ऊस वाहतुकीचा करार केला होता. त्यासाठी ऊसतोड मजूर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ताडसोन्ना (ता.बीड) येथील कल्याण बापूराव मुंडे याच्याशी १५ मे २०२४ रोजी बैठक झाली. या बैठकीत १६ कोयते (३२ ऊसतोड मजूर) पुरविण्यासाठी १६ लाख रुपयांचा व्यवहार ठरला होता. त्यानुसार घुगे यांनी सुरुवातीला दीड लाख रुपये रोख दिले. त्यानंतर विविध टप्प्यांत ऑनलाइन व रोख स्वरूपात एकूण १५ लाख रुपये मुंडे याला अदा केले. मात्र, करारानुसार १६ कोयत्यांऐवजी केवळ ६ कोयते (१२ मजूर) पुरविण्यात आले. हे मजूरही काही दिवसांत काम सोडून निघून गेले. उर्वरित मजूर पुरविण्याबाबत वारंवार विचारणा करूनही आरोपीने टाळाटाळ केली. अखेर जानेवारी २०२५ मध्ये पैसे परत देण्याचे आश्वासन देऊनही त्याने रक्कम परत केली नाही किंवा मजूरही उपलब्ध करून दिले नाहीत. या व्यवहारात पुरविण्यात आलेल्या मजुरांकडून सुमारे १ लाख ५२ हजार रुपयांचे काम झाले असून, उर्वरित १३ लाख ४८ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी भीमराव घुगे यांच्या फिर्यादीवरून कल्याण बापूराव मुंडे याच्याविरुद्ध आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा युसूफवडगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास पो.हे.कॉ.अमजद सय्यद हे करीत आहेत.

# एलसीबीची मोठी कारवाई: ६ दुचाकींसह आरोपी जेरबंद; ३ गुन्हे उघड!

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात वाढत्या दुचाकी चोऱ्यांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. अंबाजोगाईसह शेजारच्या जिल्ह्यांतून दुचाकी चोरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, त्याच्याकडून २ लाख २० हजार रुपये किमतीच्या एकूण ६ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे दुचाकी चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.**

बीड जिल्ह्यामध्ये घडणाऱ्या दुचाकी चोऱ्यांच्या अनुषंगाने प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांनी चोरांचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक कार्यरत होते. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना,



पोलिसांना तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदाराकडून संशयित आरोपीची माहिती मिळाली. दिनांक १५ जून २०२६ रोजी पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, संतोष बाबासाहेब मुंडे (रा. वरवटी, ता. अंबाजोगाई) याने बीडसह शेजारील जिल्ह्यातून अनेक दुचाकी चोरल्या आहेत आणि त्या आपल्या घराच्या पाठीमागे लपवून ठेवल्या आहेत. या माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने तातडीने छापा टाकून संतोष मुंडे याला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीकडे सखोल चौकशी केली असता, त्याने विविध ठिकाणांवरून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्याच्या घराच्या पाठीमागे झाकून ठेवलेल्या ६ दुचाकी पोलिसांनी जप्त केल्या. यामध्ये:अंबाजोगाई शहरातून: २ दुचाकी पुण्यातून: १ दुचाकी जप्त केलेल्या वाहनांची पोलीस अभिलेखावरून पडताळणी केली असता, खालील तीन गुन्हे उघडकीस आले आहेत: पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर - गु.र.नं १३२/२०२६ (कलम ३०३(२) बी.एन.एस.) पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर - गु.र.नं ३२४/२०२५ (कलम ३०३(२) बी.एन.एस.) ३) पोलीस ठाणे गंगाखेड, जि. परभणी - गु.र.नं २९/२०२६ (कलम ३०३(२) बी.एन.एस.)उर्वरित ३ मोटारसायकलच्या चोरीचा रेकॉर्ड अद्याप मिळालेला नसून, अंबाजोगाई शहर पोलीस या संदर्भात अधिक तपास करत आहेत. आरोपी आणि जप्त केलेला मुद्देमाल पुढील कारवाईसाठी अंबाजोगाई शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. ही धडक कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अंबाजोगाईचे पोलीस उपअधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे आणि स्थानिक गुन्हे ▶▶ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk